
ePaper
ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस इंडियाने मागितली खासदार उदयनराजे यांची जाहीर माफी

वर्ष - 9 | अंक -137 | UDYAM-MH-26-0158827




महाईन्यूज ™

## आतील पानांत

- मुंबई इंडियन्सची परंपरा कायम!
- पहिल्याच सामन्यात विराट इतिहास ?
- ममता बॅनर्जींचे राजकारण संपणार?
- अपघातग्रस्तांना मोफत उपचार

www.mahaenews.com | शनिवार, दि. 10 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**ठाकरे बंधूंची पहिली संयुक्त सभा** उद्धव–राज यांच्या संयुक्त सभेने राज्याचे लक्ष वेधले

# नाशिकमध्ये ‘ठाकरे ब्रँड’ची गर्जना!

## राज ठाकरेंच्या संकल्पनेतून साकारले भव्य ‘शिवशक्ती’ व्यासपीठ

| नाशिक | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**नाशिकच्या राजकारणात शुक्रवारी सायंकाळी इतिहास घडला. अनेक वर्षांच्या दुराव्यानंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोन ठाकरे बंधू एकाच व्यासपीठावर, एकाच उद्देशाने आणि एकाच सूरात बोलताना पाहण्याचा क्षण राज्यभरातील राजकीय वर्तुळासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला. नाशिक महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या युतीतून पार पडलेली ही पहिली संयुक्त जाहीर सभा केवळ राजकीय नव्हे, तर भावनिक आणि प्रतीकात्मक अर्थानेही ‘ठाकरे ब्रँड’ची पुनःस्थापना करणारी ठरली.**



- ‘शिवशक्ती’ व्यासपीठ ठरले आकर्षणाचे केंद्र
- भाजपावर उद्धव–राज यांचा जोरदार हल्लाबोल
- मनसे–शिवसेना (उबाठा) युतीचा शक्तिप्रदर्शनाचा सोहळा

या सभेचे सर्वात मोठे आकर्षण ठरले ते मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या संकल्पनेतून साकारलेले भव्य ‘शिवशक्ती’ व्यासपीठ. व्यासपीठाच्या पार्श्वभूमीवर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या खांद्यावर हात ठेवलेले विशाल छायाचित्र लावण्यात आले होते. हे छायाचित्र केवळ सजावटीचा भाग नव्हते, तर ठाकरे कुटुंब, शिवसेनेचा वारसा आणि मराठी अस्मितेचा भावनिक संदेश देणारे प्रभावी प्रतीक ठरले.

व्यासपीठाच्या दोन्ही बाजूंना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची मशाल आणि मनसेचे रेल्वे इंजिन ही दोन्ही पक्षांची चिन्हे समतोलपणे मांडण्यात आली होती. यामधून ‘युती म्हणजे विलय नाही, तर समान ध्येयासाठी एकत्र आलेली ताकद’ हा स्पष्ट संदेश देण्यात आला. या संपूर्ण व्यासपीठ रचनेबाबत माजी आमदार वसंत गिते यांनी, “व्यासपीठ कसे असावे, याचा प्रत्येक तपशील स्वतः राज ठाकरे यांनी ठरवला होता. त्यांच्या कलात्मक दृष्टीमुळेच हे व्यासपीठ इतके प्रभावी आणि लक्षवेधी ठरले,” असे नमूद केले. हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानावर सायंकाळी सभा सुरू होण्यापूर्वीच शिवसैनिक आणि मनसैनिकांनी अभूतपूर्व गर्दी केली होती. ढोल-ताशांच्या गजरात कार्यकर्ते मिरवणुकीने सभास्थळी दाखल झाले. हातात भगवे झेंडे, गळ्यात भगवे उपरणे आणि काहींच्या हातातील पेटत्या मशाली यामुळे संपूर्ण परिसर भगवेमय झाला होता. उद्धव आणि राज ठाकरे यांच्या आगमनाच्या क्षणी आकाशात फटाक्यांची जोरदार आतषबाजी करण्यात आली. खास या सभेसाठी तयार करण्यात आलेले ‘पक्ष आपला ठाकरे’ हे गीत वाजताच कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला पोहोचला.

सभेच्या सुरुवातीलाच उभय पक्षांच्या संयुक्त जाहीरनाम्याचे प्रकाशन करण्यात आले. व्यासपीठावर दोन्ही पक्षांचे एकूण १२२ उमेदवार उपस्थित होते. सभेचे थेट प्रक्षेपण करण्यासाठी दोन भव्य एलईडी पडदे लावण्यात आले होते. राज ठाकरे भाषणासाठी उभे राहताच मैदानात शिट्ट्या, टाळ्या आणि घोषणांचा प्रचंड कडकडाट झाला. कार्यकर्त्यांचा उत्साह इतका प्रचंड होता की, काही काळ राज ठाकरे यांना उपस्थितांना शांत राहण्याचे आवाहन करावे लागले.

उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात सत्ताधारी भाजपावर जोरदार हल्लाबोल केला. “आम्ही एकत्र आलो म्हणून काहींनी फटाके फोडले आणि दुसऱ्या दिवशी तिकडे गेले. भाजपात उपरेच जमा झाले आहेत. ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्सने त्रस्त असलेले लोक तिकडे जात आहेत. ज्या रामाने रावणाचा वध केला, तो रावण जरी आला तरी त्यालाही भाजपात प्रवेश देतील,” अशी बोचरी टीका त्यांनी केली.

भाजपाला ‘उपटसुभांचा पक्ष’ म्हणत उद्धव ठाकरे म्हणाले, “गेल्यावेळी नाशिकमध्ये आमच्या व्यासपीठावर असलेली माणसे तिकडे गेली. पण आजही आमचे व्यासपीठ भरलेले आहे. आमच्याकडे पोरांचा तोटा नाही. अस्सल निष्ठावंत आजही आमच्याबरोबर आहेत.”

राज ठाकरे यांनीही आपल्या भाषणातून सत्ताधाऱ्यांवर गंभीर आरोप करत प्रस्थापित राजकारणावर घणाघात केला. “भाजपाला पक्ष वाढवायचा असेल तर कुत्ता, बिल्ली सगळे चालतात. बरबटलेली माणसे घेऊन त्यांचे लंगोट धुवून डोक्यावर घेऊन नाचायचे काम भाजपाच्या निष्ठावंतांवर आले आहे,” अशा शब्दांत त्यांनी भाजपावर टीका केली.

## रावणालाही पक्षात घेतील

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, आम्ही एकत्र आल्यानंतर ज्यांनी फटाके फोडले, ते दुसऱ्या दिवशी तिकडे गेले. भाजपाच्या आमदार देवयानी फरांदे यांनीच यावरून भाजपावर टीका केली. भाजपा उपऱ्यांचा पक्ष असल्याचे त्या म्हणाल्या. तिकडे सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, शनी सिंगणापूर आणि भाजपाला दरवाजेच नाहीत. पण शनी सिंगणापूरला जातात ते संकटग्रस्त असतात आणि भाजपात येणारे ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्स ग्रस्त येत आहेत. चोर, दरोडेखोर येत आहेत. ज्या रामाने रावणाचा वध केला, तो रावण जरी आला तरी त्यालाही पक्षप्रवेश देतील. इतके हे निर्लज्ज झाले आहेत.”

## मोहन भागवतांचे तरी ऐका...

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, “मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिक दत्तक घेतले होते. पण राज ठाकरे बोलले तसे, ज्यांना राजकारणात मुले होत नाहीत, ते आमची मुले दत्तक घेतात. ते काय शहर दत्तक घेणार? म्हणून मोहन भागवतांना ‘अपत्य वाढवा, अपत्य वाढवा’, असा टाहो फोडावा लागतो. अपत्य वाढवा म्हणजे तुमची राजकारणातील अपत्य वाढवा. मोहन भागवतांचे इतके तरी ऐकायला हवे.”

## शहरात छुप्या मार्गाने विक्री — पुणे शहरात नायलॉन मांजावर बंदी तरी सर्रास विक्री

# माणसाच्या जिवाची किंमत?

## नायलॉन मांजावर कडक बंदी

। पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे शहरात जानेवारी महिन्यात मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर आकाश रंगीबेरंगी पतंगांनी भरून येते. मात्र, पतंग कापण्याच्या स्पर्धेत जिंकण्याच्या हव्यासापोटी बंदी असलेला नायलॉन (चिनी) मांजा सर्रास वापरला जात. आहे. मात्र तो मांजा नागरिक, प्राणी आणि विशेषतः पक्ष्यांसाठी जीवघेणा ठरत आहे. शासनाने नायलॉन मांजावर कडक बंदी घातलेली असतानाही पुण्यात अनेक ठिकाणी छुप्या मार्गाने त्याची विक्री आणि वापर सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव पाहणीत समोर आले आहे.**



गेल्या आठवडाभरात नायलॉन मांजामुळे पक्षी जखमी होण्यासह अनेक नागरिक अपघातग्रस्त झाल्याच्या घटना घडल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर 'नवराष्ट्र'तर्फे कात्रज, धनकवडी, कोंढवा, लष्कर, पर्वती तसेच शहराच्या मध्यवर्ती भागात पाहणी करण्यात आली. या ठिकाणी लहान मुलांपासून तरुणांपर्यंत अनेकजण सर्रास नायलॉन मांजाचा वापर करत असल्याचे दिसून आले. यासंदर्भात संवाद साधला असता एका तरुणाने स्पष्ट कबुली देत सांगितले की सुती मांजामुळे पतंग पटकन कापली जाते. पेच जिंकण्यासाठी नायलॉन मांजाच जास्त प्रभावी असतो. बंदी असल्याची पूर्ण माहिती असूनही साधारण एक हजार रुपये खर्चून नायलॉन मांजाचे बंडल छुप्या मार्गाने खरेदी केले जात असल्याचेही समोर आले.पोलीस कारवाईची भीती असल्याने हा व्यवहार गुप्तपणे केला जात असला, तरी शहरातील गल्लीबोळांतील अनेक व्यापाऱ्यांकडे आजही हा घातक मांजा उपलब्ध आहे. कोणताही ठोस धाक नसल्याने बंदी असलेला 'चिनी मांजा' सहजपणे मुलांच्या हातात पोहोचत असल्याचे भयावह चित्र पाहणीतून उघड झाले आहे. पतंगांच्या कापाकापीनंतर कागद व मांजा रस्त्यावर फेकला जातो. हा मांजा विजेच्या तारा, केबल, झाडे आणि खांबांना अडकून अपघातांचे कारण ठरत आहे. शहरातील विविध भागांत

### कारवाई फक्त सणापुरती?

आकाश रंगीबेरंगी पतंगांनी भरून येते. मात्र, पतंग कापण्याच्या स्पर्धेत जिंकण्याच्या हव्यासापोटी बंदी असलेला नायलॉन (चिनी) मांजा सर्रास वापरला जात. आहे. मात्र तो मांजा नागरिक, प्राणी आणि विशेषतः पक्ष्यांसाठी जीवघेणा ठरत आहे. शासनाने नायलॉन मांजावर कडक बंदी घातलेली असतानाही पुण्यात अनेक ठिकाणी छुप्या मार्गाने त्याची विक्री आणि वापर सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव पाहणीत समोर आले आहे.

नागरिकांच्या मानेला, हातांना आणि चेहऱ्यावर गंभीर जखमा झाल्याच्या घटना घडल्या आहेत. कावळे, कबुतरे, घार, चिमण्या, साळुंखी, वटवाघळे यांसारखे पक्षी या मांजामध्ये अडकून जखमी होणे किंवा मृत्युमुखी पडण्याचे प्रमाण वाढले आहे. काहींना कायमचे अपंगत्वही आले आहे. मानव, प्राणी आणि पर्यावरणाच्या सुरक्षिततेसाठी राज्य सरकारने २०१७ मध्ये नायलॉन मांजावर बंदी घातली आहे. बंदीचे उल्लंघन केल्यास पाच हजार रुपयांपर्यंत दंड आणि तीन वर्षांपर्यंत कारावासाची तरतूद आहे. मात्र, या नियमांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र आहे. शहरात आजही नायलॉन व काचेरी मांजाची खुलेआम विक्री सुरू असून, पोलिस प्रशासनाची कारवाई केवळ नावापुरतीच असल्याची नागरिकांची भावना आहे.मकरसंक्रांत जवळ आली की कारवाईचे हत्यार उपसले जाते; मात्र ती बहुतांशी कागदोपत्रीच मर्यादित राहते. उत्पादक, वितरक आणि विक्रेत्यांवर ठोस कारवाई होत नसल्यानेच हा जीवघेणा मांजा आजही वापरात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. बंदी असलेल्या नायलॉन मांजाच्या विक्रीवर आणि वापरावर तातडीने कठोर कारवाई करण्याची जोरदार मागणी नागरिकांनी केली आहे.

---

# राज्य उत्पादन शुल्क विभागाला हायकोर्टाचा दणका!

## मद्यपरवाना निलंबित करण्याचा आदेश उच्च न्यायालयाने स्थगित केला

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुण्याच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या एका कथित मनमानी कारवाईला उच्च न्यायालयाने दणका दिला आहे. शहरातील नामांकित "2BHK डायनर अँड की क्लब"चा मद्यपरवाना निलंबित करण्याचा आदेश उच्च न्यायालयाने स्थगित केला आहे. इतकंच नाही तर तात्काळ सील हटवून व्यवसाय सुरू करण्याची परवानगी देखील दिली आहे.**




राज्य उत्पादन शुल्क विभागाने गेल्या वर्षी (दि. १५ ऑगस्ट) शहरातील एकूण आठ पबवर नियम आणि वेळेनंतर पब सुरू ठेवून तसेच मद्यविक्री केल्याप्रकरणी कारवाई केली होती. या कारवाईनंतर अ-निमियतेचा ठपका ठेवत दोन दिवसांपूर्वी उत्पादन शुल्क विभागाने 2BHK डायनर अँड की क्लबवर कारवाई करत त्यांचा १५ दिवसासाठी परवाना रद्दकरून पबला सील ठोकले होते.दरम्यान मात्र राज्य उत्पादन शुल्क विभागाने इतर त्या आठ पबवर कारवाई केली नव्हती. यामुळे देखील या करवाईबाबत उलटसुलट चर्चा सुरू होती. त्यापबला अभय कोणाचे असाही प्रश्न विचारला जात होता. आता न्यायालयाच्या निकालानंतर मात्र आणखीनच राज्य उत्पादन शुल्क विभागावर प्रश्न चिन्ह उपस्थित झाले आहेत.

### जबाबदारीने वागावे लागणार

न्यायालयाच्या या निर्णयामुळे "कायदा सर्वांसाठी समान आहे आणि कोणतीही यंत्रणा कायद्यापेक्षा मोठी नाही" हा संदेश पुन्हा एकदा ठळकपणे अधोरेखित झाला आहे.हा निर्णय केवळ एका आस्थापनापुरता मर्यादित न राहता, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या जबाबदारी, पारदर्शकता आणि अधिकारांच्या मर्यादा यावरही बोट ठेवणारा ठरला आहे. त्यामुळे भविष्यात अशा प्रकारच्या कारवायांबाबत प्रशासनाला अधिक जबाबदारीने वागावे लागणार आहे. याप्रकरणात कायदा आणि सुव्यवस्थेचा विजय झाल्याची प्रतिक्रिया ब्रँड ओनर डॉ. हेरंब शेलके यांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान या कारवाई विरोधात क्लबचे प्रमुख डॉ. हेरंब शेलके यांनी उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. न्यायालयात त्यांच्या वतीने ॲड. प्रल्हाद परांजपे यांनी जोरदार युक्तिवाद केला. उत्पादन शुल्क विभागाची कारवाई ही एकतर्फी, अविचारी आणि उच्चस्तेची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. न्यायालयाने याची दखल घेत, १५ दिवसांसाठी लावण्यात आलेला मद्यपरवाना निलंबनाचा आदेश स्थगित केला.

## जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञान भाजप समोर केवळ विकासाचा मुद्दा

# विरोधकांच्या भुलथापांना बळी पडू नका; मंत्री पंकजा मुंडे

## महिला भगिनींनो “देवाभाऊं”च्या विजयासाठी निवडणूक हाती घ्या- पंकजा मुंडे

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भाजपची मुख्य भूमिका म्हणजे स्त्रीचा सन्मान आहे. स्त्रीशक्ती शिवाय शिव सुद्धा शून्य आहे. म्हणूनच भाजपने महिला भगिनींचा सन्मान करणारे स्त्री शक्तीयुग आणले. म्हणूनच महिला भगिनींनी आपल्या विकासाची ही निवडणूक हाती घ्यायची आहे. निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पाठीशी उभे राहायचे आहे. विरोधक चुकीचे सांगतील मात्र या भूलथापांना बळी पडायचे नाही. भाजपचा विकासाचा मुद्दा आहे आणि याच मुद्द्यावर आपण भाजपच्या उमेदवारांना बहुमताने निवडून द्यायचे आहे असे आवाहन पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी केले.**



भारतीय जनता पार्टी, आर.पी. आय. (आ.) मित्रपक्षातील अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ विमल गार्डन, रहाटणी येथे पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांची जाहीर सभा पार पडली. यावेळी शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे उपस्थित होत्या.

दरम्यान प्रभाग क्रमांक 22 मधील उमेदवार नीता पाडाळे, कोमल काळे, ॲड हर्षद नढे आणि विनोद नढे. प्रभाग 23 मधील उमेदवार मनीषा पवार ,तानाजी बारणे, सोनाली गाडे, अभिषेक बारणे, प्रभाग 24 मधील उमेदवार करिष्मा बारणे, सिद्धेश्वर बारणे, शालिनी गुजर, गणेश गुजर. प्रभाग क्रमांक 27 मधील उमेदवार बाबासाहेब त्रिभुवन, अर्चना तापकीर, सविता खुळे, चंद्रकांत नखाते. प्रभाग 28 शत्रुघ्न काटे, अनिता काटे, संदेश काटे, कुंदा भिसे या उमेदवारांच्या प्रचारार्थ ही प्रचार सभा पार पडली.

पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या, गेल्या 20 ते 25 वर्षापासून सातत्याने पिंपरी चिंचवड शहरात येत असते. या शहराने कायम विकासाच्या भूमिकेला पाठिंबा दिलेला आहे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील विकासाची भूमिका ठामपणे मांडल्यामुळे गेल्या दहा वर्षात सर्वसामान्यांपर्यंत विकासाची गंगा पोहोचली आहे. उज्वला योजना, गरीब कल्याण योजना, जनधन योजना यांसारख्या योजनांमधून तळागाळातल्या वंचितांपर्यंत मदतीचा ओघ पोहोचला आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनधन योजना अंमलात आणली नसती तर आज आमच्या लाखो लाडक्या बहिणींचे पैसे थेटपणे त्यांच्या खात्यात जमा झाले नसते. याच माध्यमातून आलेली किसान योजना, बेटी बचाव बेटी पढाव या योजनेमधून आपण वंचित घटकांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला आहे त्यामुळेच भाजप म्हणजे विकास आणि विकास म्हणजे प्रत्येक घटकाची सुधारणा हे सूत्र आहे. दिल्लीपासून गल्लीपर्यंत एक विचाराचे सरकार असल्यानंतर देशांमध्ये अमुलाग्र सुधारणा कशी होऊ शकते हे आपण गेल्या दहा वर्षांमध्ये पाहिले आहे. भाजपच्या माध्यमातून स्त्रीशक्तीचे एक युग आपण आणले आहे. स्त्रीचा सन्मान करणारी भाजपची भूमिका आहे. स्त्रीशक्ती शिवाय शिव सुद्धा शून्य आहे. त्यामुळे जी पाळण्याची दोरी सांभाळते ती जगाला सुद्धा उद्धारू शकते. ही भूमिका भाजपने सर्वदूर पोहोचवली . महिलाशक्ती मध्ये खूप मोठे दायित्व आहे. म्हणूनच भाजपच्या माध्यमातून आणलेली ”लाडकी बहीण योजना” समाजाच्या सर्व घटकांवर दूरगामी परिणाम करणारी ठरली असेही मुंडे म्हणाल्या. भाजपने कधीच जातीवादी धर्मवादी भूमिका स्वीकारली नाही असे सांगून पंकजा मुंडे म्हणाल्या गरिबांचे अश्रू पुसताना कोणताही रंग, कपडे याचे प्रमाण मानले नाही. कोणतीही योजना रंग पाहून राबविली नाही. तर प्रत्येक योजनेत माणुसकीची जाण आहे. गरीबीच्या रंगातून बाहेर पडून संपन्नतेचा रंग आपण प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवला आहे.

जननेते गोपीनाथ मुंडे साहेबांचा आशीर्वाद आपल्या सर्वांच्या पाठीशी आहे. त्यांची कन्या म्हणून माझी ओळख आहे. मराठवाड्यातील प्रत्येक व्यक्तीच्या मनात मुंडे साहेबांचे नाव कोरलेले आहे. त्याच मुंडे साहेबांच्या समाजभिमुख कार्याला स्मरून भाजपला या भागातील रहिवासी मतदान करतील असा मला विश्वास आहे. लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांनी या भागात विकासाचा झंजावात निर्माण केला त्यांच्या स्मृतींना स्मरून या निवडणुकीत एक विचाराने भाजपला निवडून आणायचे आहे.

### भाजपच्या पाठीशी ढाल म्हणून महिला शक्ति उभी – पंकजा मुंडे

”गरिबांचे कल्याण आणि महिलांचा सन्मान” या धोरणातून भाजप काम करत आहे. मोठमोठ्या देवांना देखील दानवांचा संहार करणे अशक्य झाले. तेव्हा त्यांनी देवीचे आवाहन केले. हे स्त्रीशक्तीचे सामर्थ्य आहे. सतयुग, त्रेतायुग त्यानंतर द्वापरयुग आणि मग कलियुग आपण जाणतो . मात्र भाजपने स्त्रीशक्तीचे युग आणले आहे. पालिकेच्या होणाऱ्या या निवडणुकांमध्ये हीच स्त्रीशक्ती भाजपच्या पाठीशी ढाल म्हणून उभी राहणार आहे असे पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या.

“ विरोधक टीका करतील मात्र आम्ही विकासावर बोलणार आहोत. भाजपच्या माध्यमातून पुढील पन्नास वर्षांचा विचार करून वाहतुकीचे नियोजन करायचे आहे. पाण्याच्या व्यवस्थापनावर ठाम भूमिका मांडायची आहे, वाहतूक कोंडी कायमची सोडवायची आहे. मेट्रो अधिक वेगवान करायची असून तिचे मार्ग अधिक विस्तारायचे आहेत. सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या हक्काचे घर, स्वतःचे छप्पर मिळावे, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाहिलेले स्वप्न आहे. ते स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्याची जबाबदारी आपली आहे.
**–शंकर जगताप,** निवडणूक प्रमुख, आमदार, पिंपरी चिंचवड शहर.

# कष्टकऱ्यांचे नेते बाबा कांबळे यांचा भाजपाला पाठिंबा!

## मिशन- PCMC : आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्त्वात मैदानात

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकीय पटलावर मोठी आणि निर्णायक घडामोड घडली असून, कष्टकरी, रिक्षा चालक व असंघटित कामगारांचे बुलंद नेतृत्व म्हणून ओळख असलेले डॉ. बाबा कांबळे यांनी भाजपाला जाहीर पाठिंबा देत आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला आहे. आगामी २०२६ च्या महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा पाठिंबा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.**



पिंपरी येथे आयोजित जाहीर सभेत बोलताना डॉ. बाबा कांबळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार टीका केली. “कष्टकऱ्यांचे स्वतंत्र आणि लढाऊ नेतृत्व अजित पवारांना नको आहे,” असा थेट आरोप त्यांनी केला. आम्ही 25 वर्षे राष्ट्रवादीला साथ दिली. मात्र, आम्हाला प्रतिनिधीत्व दिले नाही. आता राज्यातील 29 महापालिका निवडणुकीमध्ये आम्ही राष्ट्रवादीच्या विरोधात काम करणार आहोत, असा इशाराही बाबा कांबळे यांनी दिला आहे.

डॉ. कांबळे म्हणाले की, कष्टकरी, रिक्षा चालक आणि असंघटित कामगारांच्या प्रश्नांसाठी संघर्ष करत असताना जाणीवपूर्वक अडचणी निर्माण केल्या गेल्या. एका टप्प्यावर “प्रस्थापित नेत्याच्या मुलासाठी” आपला राजकीय बळी देण्याचा प्रयत्न झाला आणि सर्व बाजूंनी कोंडी करण्यात आली. अशा कठीण काळात आमदार महेश लांडगे यांनीच खऱ्या अर्थाने मदतीचा हात पुढे केला, असे त्यांनी स्पष्ट केले.

याच सभेत डॉ. बाबा कांबळे यांनी मोठे राजकीय आवाहन करत सांगितले की, “पिंपरी-चिंचवडमधील सुमारे ७ लाख रिक्षा चालक आणि कष्टकरी संघटनांचे सदस्य राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकाही उमेदवाराला मतदान करणार नाहीत,” असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला. विशेष म्हणजे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा गुरूवारी पिंपरी-चिंचवड शहराचा दौरा होता. या दौऱ्यामध्ये बाबा कांबळे यांच्याशी संवाद असा दुपारी कार्यक्रम नियोजित होता. मात्र, कांबळे यांनी थेट भाजपाचे व्यासपीठ गाठले आणि भाजपाला पाठिंबा दिला. शहरात स्थानिक नेतृत्त एक होत आहे, याचे हे संकेत मानले जात आहेत. शहरातील बहुजन, वंचित आणि कष्टकरी वर्गाच्या प्रश्नांवर लढणारे नेतृत्व एकत्र येत असल्याने ‘मिशन PCMC’ अंतर्गत आमदार महेश दादा लांडगे यांच्या नेतृत्त्वात नवे राजकीय समीकरण आकाराला येत आहे. “कष्टकऱ्यांच्या लढ्यात जे नेते प्रामाणिकपणे साथ देतात, त्यांनाच जनतेचा आशीर्वाद मिळतो,” असा विश्वास व्यक्त करत डॉ. कांबळे यांनी आगामी काळात ही ताकद अधिक संघटितपणे काम करेल, असे सांगितले. आमदार महेश लांडगे आणि डॉ. बाबा कांबळे यांच्या ‘दादा–बाबा’ जोडीमुळे पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात मोठा बदल घडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

“ कष्टकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आम्ही कितीही अडचणीत आलो तरी मागे हटणार नाही. जेव्हा नेता खऱ्या अर्थाने कष्टकऱ्यांच्या पाठीशी उभा राहतो, तेव्हा त्याच्यासोबत आम्ही ठामपणे उभे राहतो. पिंपरी-चिंचवडमधील प्रत्येक रिक्षाचालक, कामगार आणि असंघटित कामगार यांचा आवाज ऐकला जाईल, त्यांच्या समस्यांसाठी आम्ही लढू आणि न्याय मिळवून देऊ. राजकारण आमच्या सत्तेसाठी नाही, तर कष्टकऱ्यांच्या सन्मान, सुरक्षा आणि भविष्याच्या सुरक्षेसाठी आहे.
**–डॉ. बाबा कांबळे,** कामगार नेते.




# निवडणुकीत उमेदवारांची विक्री...!

**निवडणूक प्रक्रियेत निकोप वातावरण, निर्भयता, दबावमुक्त मत प्रक्रिया हवी. या सगळ्या अपेक्षा केव्हाच फोल ठरल्या आहेत. मतदार नव्हे, तर पैसा निर्णायक ठरतो आहे. लोकांचा कौल नव्हे, तर धनशक्तीचा दबदबा सत्ता ठरवतो आहे. राजकारण पूर्वीही पवित्र नव्हते, हे मान्य, पण आजचे राजकारणी गब्बर झाले.**

त्याच्या अंगाला भ्रष्टाचाराचा मलिदा चिकटलेला दिसतो. या मलिद्याचा वापर केवळ सत्ता टिकविण्यासाठी होत आहे. आता सत्तेपर्यंत पोहोचण्यासाठीही निर्लज्जपणे होतो. नगर परिषदांच्या निवडणुकांमध्ये मत विक्रीचे आरोप झाले. तेव्हा दीड हजार कोटी रुपयांपर्यंत खर्च झाल्याच्या चर्चा रंगल्या. तेव्हाही लोकशाही हादरली होती. आता स्थिती आणखी भयावह आहे.म तदान ही लोकशाहीतील प्रक्रिया आहे. ती जनतेच्या स्वप्नांची पुर्ती आहे. अपेक्षांची आणि मूल्यांची यात्रा आहे. निवडणूक हा त्या यात्रेतील सर्वात पवित्र टप्पा आहे. याच टप्प्यावर सामान्य माणसाला अधिकार आहेत. तो आपल्या हातातील मताच्या बळावर सत्तेला आरसा दाखवतो. राज्यकर्त्यांना उत्तरदायी बनवतो. स्वतःच्या भवितव्यावर शिक्कामोर्तब करतो. मात्र मत खरेदी. उमेदवार खरेदीने नवे प्रश्न उभे ठाकले. निवडणूक लोकशाहीचा आत्मा होय. तोच कमजोर करण्यात आला. सत्ताधारी त्यात वरचढ आहेत. लोकशाहीचे



रूपांतर बाजारात झाले? आजचे चित्र पाहिले तर असे वाटते की निवडणूक आता लोकशाहीचा उत्सव राहिलेला नाही. तर तो एक व्यवहार, एक सौदा, एक बोली ठरू लागला. थेट उमेदवार खरेदीचा बाजार सजला होता. मतदार कोण राहणार! मतदार यादीतील कोण मतदान करणार! हेसुध्दा पक्ष ठरवू लागले. अन् निवडणूक आयोग आंधळा, बहिरा, मुका बनला आहे. अलिकडे एकएका झोपडीवजा घरात दोनशे मतदार दिसले. एक बाप त्याला अनेक मुलें. बापापेक्षा मुलाचे वय जास्त. असे शेकडो अजबगजब प्रकार दिसले. अगोदर रिंगणात काही डमी उमेद्वार राहत होते. आता उपड बाजार होऊ लागला. नेते इतके निर्वावले. ही लोकशाही नव्हे. धनशाही आहे. दबावशाही आहे. ती निषेधार्ह आहे. गोरगरिबांच्या हितांवर गदा आहे. जाती, जमाती, ओबीसींची मुस्कुटदाबी आहे. भ्रष्टमार्गे अविरोध निवडून येणाऱ्यांचे काही नेते समर्थन करतात. त्यांना एकदा मतदारांनी बदडावे, म्हणजे निर्लज्जपणाची हद करण्याची हिंमत होणार नाही. उमेदवारी मागे घेण्यासाठी उमेदवार पाहून बोली लागते. ही गोष्ट ऐकताना अंगावर काटा उभा राहतो. एखाद्या उमेदवारामागे पाच कोटी, सात कोटी, दहा कोटी रुपयांचा व्यवहार होतो. असे असे आरोप केवळ विरोधक करत नाहीत, तर सत्ताधाऱ्यां मधूनही हे सत्य बोलले जाते. खा. संजय राऊत यांच्यासह अनेक नेत्यांनी हा प्रकार उघडपणे मांडला. हा प्रकार अपघाती नाही. हा एक पॅटर्न आहे. तो 'सूरत पॅटर्न' म्हणून ओळखला जातो. लोकसभेत वापरलेला. सत्ता हस्तगत करण्यासाठी राबवला. आता स्थानिक स्वराज्य संस्थांपर्यंत पोहोचला. या पॅटर्नचा अर्थ साधा आहे. निवडणूक लढवू नका. ती विकत घ्या. मतदारांना जिंकण्याची गरज नाही, उमेदवार खरेदी करा. लोकांचा विश्वास संपादन करण्याची गरज नाही. पैशाचा मारा करा. हेच आजच्या राजकारणाचे भयावह वास्तव आहे. याच वास्तवाचा प्रत्यय आपल्याला अलीकडील घडामोडींमध्ये येतो. तब्बल ६९ नगरसेवक अविरोध निवडून आले. त्यापैकी एक-दोन किंवा त्यापेक्षा जास्त अपवादही असतील. बहुतेक सत्ताधारी पक्षांशी संबंधित आहेत. हे सहज शक्य आहे का? लोकशाहीत स्पर्धा असते. मतभिन्नता असते. संघर्ष असतो, मग इतक्या मोठ्या संख्येने अविरोध निवडणूक होणे म्हणजे काय? यामागे केवळ 'एकमत' आहे का, की यामागे धनशक्ती आणि सत्तासक्ती आहे? उत्तर सर्वांनाच ठाऊक आहे. लोक ते बोलत नाहीत. खासगीत मान्य करतात. कारण सत्य बोलणे धोकादायक झाले. पैसा आणि सत्ता बांची महायुती इतकी मजबूत झाली. त्यात सामान्य माणसाचा आवाज गुदमरतो आहे. निवडणुकीच्या रिंगणातही काही विकलेले उमेदवार असतात. आपला पराभव निश्चित आहे. हे माहित आहे. तरी ते मैदानात असतात. त्या उमेदवाराला कोण्या अन्य पक्षाच्या उमेदवाराला निवडून आणावयाचे असते. त्यासाठी स्पर्धेत असलेल्या उमेदवाराची मते कापावयाची असतात.

## प्रासंगिक »

### पर्यावरण रक्षक

***गाडगीळ केवळ एक शास्त्रज्ञ नव्हते, ते एक लेखक, शिक्षक, मार्गदर्शक आणि समाजसुधारकदेखील होते.***

पश्चिम घाटांच्या संवर्धनासाठी दूरदर्शी दृष्टिकोनासाठी ओळखले जाणारे ज्येष्ठ पर्यावरणवादी माधव गाडगीळ यांचे पुण्यात निधन झाले. दीर्घकालीन आजाराशी सुरू असलेली झुंज अखेर संपली. गाडगीळ यांनी तळागाळातील पर्यावरण चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावली. भारतात तळागाळातील पर्यावरण चळवळीला आकार देण्यात त्यांचा मोठा वाटा होता. काही वर्षांपूर्वी त्यांनी पश्चिम घाटातील पायाभूत सुविधा आणि मोठ्या प्रमाणात विकास प्रकल्पांमुळे गंभीर नैसर्गिक आपत्ती येतील, असा इशारा दिला होता. केरळमधील वायनाडसारख्या दुर्घटनांचा इशारा त्यांनी अगोदरच दिला होता. पश्चिम घाटात विकास, खाणी करताना आपल्याला काय किंमत मोजावी लागेल. याची जाणीव त्यांनी फार अगोदरच करून दिली होती. गोव्यातील खाणी आणि पर्यावरण हा मुद्दा जेव्हा पुढे आला, तेव्हा त्यांनी खाणीतून संपत्ती मिळेल.

रशिया-युक्रेन वादामध्ये शांतिदूत म्हणून जागतिक पटलावर देखावा निर्माण करणाऱ्या अमेरिकेचा बुरखा फाटला. जगातील सर्वांत शक्तिशाली देशाने सार्वभौम राष्ट्रावर केलेल्या या अनैतिक हल्ल्यामुळे जागतिक सुरक्षिततेचे अनेक गंभीर प्रश्न निर्माण होण्याच्या मार्गावर आहेत.

# डॉलरच्या वर्चस्ववादाचा अजेंडा

या हल्ल्यामुळे रशिया-युक्रेन यांच्यादरम्यान शांतता निर्माण करण्याच्या चर्चेवर आणि इस्रायलच्या सततच्या लष्करी कारवायांवर गंभीर परिणाम होऊ शकतो. त्याहीपेक्षा अधिक चिंताजनक म्हणजे चीनला तैवानच्या एकत्रिकीकरणाच्या दीर्घकालीन योजनेसह विस्तारवादी धोरण राबविण्यासाठी अप्रत्यक्ष मोकळीक मिळू शकते. 'ऑपरेशन ॲब्सोल्यूट रिझॉल्व्ह' या कारवाईनंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हेनेझुएलाच्या तेलसंपत्तीचा वापर कसा करता येईल, याबाबत अमेरिकी तेल कंपन्यांच्या सहभागाची चर्चा केली. या कारवाईकडे जगाने तटस्थपणे पाहून चालणार नाही. अमेरिकेचा हा विस्तारवादाचा खेळ कोलंबिया, क्युबा, ग्रीनलँडपर्यंत पोहोचू शकतो. अमेरिकेला संघटितपणे विरोध झाला नाही, तर चीनच्या विस्तारवादी महत्त्वाकांक्षेला धुमारे फुटू शकतात, अनैतिक बळ मिळू शकते.व्हेनेझुएलाचे संरक्षणमंत्री अमेरिकेवर उघड टीका करत आहेत.



शिवाय, जनतेचा पाठिंबा मिळविण्यातही अमेरिका अपयशी ठरते आहे. अमेरिकेतील तेल कंपन्यांचाही ट्रम्प यांना अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. एकूणच व्हेनेझुएलावरील ही कारवाई 'मागा' (मेक अमेरिका ग्रेट अगेन) या चळवळीतील अस्वस्थ ट्रम्प समर्थकांना शांत करण्यासाठी आणि जेफ्री एफस्टीन फाईल्समुळे निर्माण झालेल्या वादळाची दिशा बदलण्यासाठी ट्रम्प यांचा हा खटाटोप आहे. ट्रम्प यांनी व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांचे अमली पदार्थ तस्करांशी संबंध असल्याचा आरोप केला असला, तरी या कारवाईमागे अमेरिकेच्या डॉलर्सची जगामधील घसरणारी हुकूमत हे प्रमुख कारण आहे. या कारवाईने अमेरिकेने डॉलर्समधील व्यवहार नाकारणाऱ्या जगातील देशांना अप्रत्यक्ष इशाराच दिला आहे. कारण अमेरिकेतच प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीत अमली पदार्थांच्या तस्करीमध्ये व्हेनेझुएलाचा सहभाग अवघा १ टक्का इतका आहे. जगातील २० टक्के तेलसाठा असलेल्या व्हेनेझुएलाला आपल्या टाचेखाली आणण्याचा प्रयत्न अमेरिका करते आहे, अशी टीकाही होत असली तरी अमेरिकेला सध्या ग्रासत असलेली डॉलर्सच्या वर्चस्ववादाची चिंता हे प्रमुख कारण असल्याचा दावा काही आंतरराष्ट्रीय विश्लेषक करत आहेत. १९७४ मध्ये अमेरिकी मुत्सद्दी हेन्री किसिंजर यांनी सौदी अरेबियाबरोबर एक ऐतिहासिक करार केला. त्यानुसार जागतिक पातळीवर तेलाची खरेदी-विक्री अमेरिकन डॉलर्समध्येच केली जाईल आणि त्या बदल्यात अमेरिका सौदी अरेबियाला लष्करी संरक्षण देईल, असे नमूद होते. या व्यवस्थेमुळेच ५० वर्षांपूर्वी जगात पेट्रोडॉलर प्रणाली अस्तित्वात आली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## निलेश राणे यांची मागणी
## उमेदवारीविरोधात कायदेशीर लढाईचे संकेत

# किशोरी पेडणेकरांची उमेदवारी रद्द करा!

## अर्जात गुन्हाची माहिती लपवली

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**कोविड काळात खिचडी घोटाळा, बॉडीबॅग घोटाळा प्रकरणी गुन्हे दाखल झालेल्या उबाठाच्या उमेदवार किशोरी पेडणेकर यांची उमेदवारी रद्द करण्याची मागणी शिवसेना आमदार निलेश राणे यांनी केली आहे. पेडणेकर यांनी उमेदवारी अर्जात गुन्ह्यांची माहिती लपवली असून त्याविरोधात कायदेशीर लढाईचे संकेत आमदार राणे यांनी दिले.**



बाळासाहेब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत आमदार राणे यांनी सांगितले की, मुंबई महापालिकेच्या वॉर्ड क्रमांक १९९ मधील उबाठा उमेदवार किशोरी पेडणेकर यांच्यावर २०२३ मध्ये दोन फौजदारी गुन्हे दाखल झाले आहेत. त्या आता जामिनावर बाहेर आहेत. मात्र पेडणेकर यांनी निवडणुकीत उमेदवारी अर्जात ही माहिती लपवली आहे. आरपीए १२५ ए कायद्यानुसार एखाद्या उमेदवाराने माहिती लपवली असल्यास सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार संबधित उमेदवाराची निवड रद्द करण्यात येते. त्यामुळे किशोरी पेडणेकर यांची उमेदवारी रद्द व्हायला हवी, असे आमदार राणे म्हणाले.पेडणेकर यांना उमेदवारी देण्यात आली नव्हती मात्र त्यांनी उद्धव ठाकरे आणि रश्मी ठाकरे यांना धमकी देऊन त्यांनी उमेदवारी मिळवली, असे आमदार राणे म्हणाले. कोविडमधील सगळं बाहेर काढेन, असे ठाकरेंना सांगून ब्लॅकमेल केलं आणि तिकिट मिळवलं, असे आमदार राणे म्हणाले. एक गुन्हा बॉडीबॅग घोटाळ्याचा आहे. कोविड काळात मुंबई महापालिकेने १६०० रुपये किमतीची बॉडीबॅग ६७१९ रुपयांना खरेदी केली. इन्फोटेक कंपनीकडून हजारो बॉडीबॅगची खरेदी केली आणि यातून मोठा भ्रष्टाचार केला, असा आरोप आमदार राणे यांनी केला. दुसरा गुन्हा एसआरए प्रकल्पासंदर्भात झालेला आहे. त्यामुळे गुन्हा दाखल असलेली व्यक्ती महापालिकेत निवडून गेल्यावर सेवा करेल की लुटमार करेल याचा वरळीकर मतदारांनी विचार करायला हवा, असे आवाहन आमदार राणे यांनी केले. पेडणेकर यांनी माणसुकी ठेवून निवडणूक प्रक्रियेतून बाहेर पडावं. या प्रकरणी पेडणेकर शंभर टक्के अपात्र ठरतील. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात दाद मागू, असे आमदार राणे म्हणाले.मुंबईच्या विकासावर बोलण्याऐवजी मुंबईला आणि महाराष्ट्रामध्ये फूट पाडणारे मुद्दे मांडत आहेत, अशी टीका आमदार निलेश राणे यांनी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरेंवर केली. ठाकरे मुंबईत इतकी वर्ष सत्तेत असताना कोणती विकास कामं केली ही त्यांनी सांगावीत, असे आमदार राणे म्हणाले. राज ठाकरेंकडून चांगल्या विषयाची अपेक्षा होती, मात्र त्यांचे विचार पाहून ती फोल ठरली. लंडनला जाताना ठाकरेंना गुजराती माणूस कसा चालतो, असा सवाल आमदार राणे यांनी केला. मुंबई काबीज करण्याचा प्रयत्न तुमची घरं चालवण्यासाठी करत आहेत. बाळासाहेबांच्या स्मृतीस्थळाशेजारी आदित्य आणि अमित ठाकरेंनी चॅनलला मुलाखत दिली. त्यांनी तेथील पावित्र्य भंग केलं, असे आमदार राणे म्हणाले.दाखल झालेल्या उबाठाच्या उमेदवार किशोरी पेडणेकर यांची उमेदवारी रद्द करण्याची मागणी शिवसेना आमदार निलेश राणे यांनी केली आहे. पेडणेकर यांनी उमेदवारी अर्जात गुन्ह्यांची माहिती लपवली असून त्याविरोधात कायदेशीर लढाईचे संकेत आमदार राणे यांनी दिले. बाळासाहेब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत आमदार राणे यांनी सांगितले की, मुंबई महापालिकेच्या वॉर्ड क्रमांक १९९ मधील उबाठा उमेदवार किशोरी पेडणेकर यांच्यावर २०२३ मध्ये दोन फौजदारी गुन्हे दाखल झाले आहेत. त्या आता जामिनावर बाहेर आहेत. मात्र पेडणेकर यांनी निवडणुकीत उमेदवारी अर्जात ही माहिती लपवली आहे. आरपीए १२५ ए कायद्यानुसार एखाद्या उमेदवाराने माहिती लपवली असल्यास सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार संबधित उमेदवाराची निवड रद्द करण्यात येते.

### कोविडमधील सगळं बाहेर काढेन

किशोरी पेडणेकर यांची उमेदवारी रद्द व्हायला हवी, असे आमदार राणे म्हणाले.पेडणेकर यांना उमेदवारी देण्यात आली नव्हती मात्र त्यांनी उद्धव ठाकरे आणि रश्मी ठाकरे यांना धमकी देऊन त्यांनी उमेदवारी मिळवली, असे आमदार राणे म्हणाले. कोविडमधील सगळं बाहेर काढेन, असे ठाकरेंना सांगून ब्लॅकमेल केलं आणि तिकिट मिळवलं, असे आमदार राणे म्हणाले. एक गुन्हा बॉडीबॅग घोटाळ्याचा आहे.

# अरे आमची पोरं कशाला पळवता

## उद्धव ठाकरेंची तोफ धडाडली, फडणवीसांवर घणाघाती हल्ला

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज नाशिकमध्ये आयोजित सभेमध्ये बोलताना शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपावर जोरदार हल्लाबोल केला आहे. आणि विशेषतः उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर शब्दांच्या फैरी झाडल्या. या सभेचे विशेष आकर्षण म्हणजे मनसे प्रमुख राज ठाकरे यांची व्यासपीठावरील उपस्थिती होती.**



उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणाची सुरुवातच भाजपच्या 'दत्तक' विधानावरून केली. "देवेंद्र फडणवीस नाशिक दत्तक घेतल असे म्हणाले होते. ज्यांना राजकारणात पोरं होत नाहीत, ते आज आमची पोरं पळवत आहेत," अशी बोचरी टीका त्यांनी केली. भाजप आता निष्ठावंतांचा राहिला नसून तो 'उपटसुंभांचा' आणि 'उपऱ्यांचा' पक्ष झाला आहे, असा आरोपही त्यांनी केला.भाजपच्या हिंदुत्वावर शंका उपस्थित करत ठाकरे म्हणाले की, तुमचं हिंदुत्व खरं आहे की चुनावी? राम मंदिराचा डंका पिटता, पण रामाच्या तपोभूमीतील झाडे कापली जात आहेत. उद्या प्रभू राम कुठे राहिले? असं विचारल्यावर ते शासकीय विश्रामगृहात राहिले असं सांगणार का? सलिम कुत्ताच्या साथीदारासोबत फोटो असलेल्या नेत्यांना पक्षात घेण्यावरून त्यांनी भाजपच्या 'कुत्ता-बिल्ली' राजकारणावर जोरदार प्रहार केला.भाजपमधील मूळ कार्यकर्त्यांबद्दल सहानुभूती व्यक्त करताना ठाकरे म्हणाले, देवयानी फरांदे यांच्यासारख्या निष्ठावंतांना आज रडू येत आहे, कारण पक्ष आज उपऱ्यांच्या हातात गेला आहे. सुधीर मुनगंटीवार म्हणतात भाजपला दरवाजे नाहीत, पण या उघड्या दरवाज्यातून उद्या हे रावणालाही पक्षात घेतील, इतके हे निर्लज्ज झाले आहेत.विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि निवडणूक आयोगाच्या भूमिकेवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. निवडणूक आयोग शेपूट घालून बसले आहे. आज आपण सावध झालो नाही, तर भविष्यात गुलामीत राहावे लागेल. आम्हाला सत्ता केवळ खुर्चीसाठी नको, तर तुमच्या विकासासाठी पाहिजे, असे आवाहन त्यांनी नाशिककरांना केले.उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणाची सुरुवातच भाजपच्या 'दत्तक' विधानावरून केली. "देवेंद्र फडणवीस नाशिक दत्तक घेतल असे म्हणाले होते. ज्यांना राजकारणात पोरं होत नाहीत, ते आज आमची पोरं पळवत आहेत," अशी बोचरी टीका त्यांनी केली.

### निवडणूक आयोगावर टीका

भाजप आता निष्ठावंतांचा राहिला नसून तो 'उपटसुंभांचा' आणि 'उपऱ्यांचा' पक्ष झाला आहे, असा आरोपही त्यांनी केला.भाजपच्या हिंदुत्वावर शंका उपस्थित करत ठाकरे म्हणाले की, तुमचं हिंदुत्व खरं आहे की चुनावी? राम मंदिराचा डंका पिटता, पण रामाच्या तपोभूमीतील झाडे कापली जात आहेत. उद्या प्रभू राम कुठे राहिले?

## ईडीने हायकोर्टात घेतली धाव

## ED प्रकरणातील याचिकेवर हायकोर्टाचा निर्णय

# ममता बॅनर्जींचे राजकारण संपणार?

### 14 जानेवारीला होणार सुनावणी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**काल ईडीने पश्चिम बंगालमध्ये I- PAC मध्ये छापेमारी केली होती. या छापेमारीनंतर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या आक्रमक झाल्या आहेत. त्यांनी छापेमारी सुरू असलेल्या ठिकाणी जाऊन त्या ठिकाणहूण पुरावे नेल्याचा आरोप ईडीने केला होता. तसेच याविरुद्ध ईडीने हायकोर्टात मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याविरुद्ध याचिका दाखल केली होती. त्यावर आज सुनावणी पार पडली आहे. या सुनावणीदरम्यान जोरदार खडाजंगी झाली असल्याचे समोर येत आहे.**



ईडीने I-PAC चे प्रतीक जैन यांच्या कार्यालयावर छापेमारी केली. छापेमारी सुरू असतानाच मुख्यमंत्री ममता बॅनर्जी त्या ठिकाणी दाखल झाल्या. त्यानंतर ईडीने पश्चिम बंगाल सरकारवर आणि खुद्द मुख्यमंत्री पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर पुरावे नेल्याचा आरोप केला आहे. त्यानंतर ईडीने हायकोर्टात धाव घेतली होती. त्यावर आज सुनावणी पर पडली.ईडीने मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर पुरावे घेऊन गेल्याच तसेच तपासात अडथळा आणल्याबद्दल हायकोर्टात धाव घेतली. त्यावर आज कोर्टात सुनावणीदरम्यान खंडाजंगी झाली. त्यानंतर कोर्टाने सुनावणी पुढे ढकलली आहे. न्यायमूर्तींच्या खंडपीठाने याचिकेवरील पुढील सुनावणी 14 जानेवारी रोजी ठेवली आहे.याचिकेवर सुनावणी सुरु असतानाच कोर्टाच्या बाहेर देखील टीएमसीच्या कार्यकर्त्यांनी गोंधळ घातल्याचे समोर येत आहे. तसेच कोर्ट रूममध्ये देखील गोंधळ असल्याचे न्यायमूर्ती यांनी कोर्टरूममधून आपल्या चेंबरमध्ये जावे लागले असल्याचे समजते आहे.आज ईडीने I-PAC कार्यालयावर छापेमारी केली. त्यानंतर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी ठेतया कार्यालयात दाखल झाल्या. तिथून त्यांनी भाजपवर टीका केली आहे. यंत्रणेच्या माध्यमातून बंगालचा डेटा आणि रणनीती चोरण्याचा प्रयत्न केला जात आहे. या कारवाईमुळे पश्चिम बंगालमध्ये जितक्या जागा जिंकण्याचे लक्ष्य भाजपने ठरवले होते ते आता शून्यावर येईल, अशी टीका त्यांनी भाजपवर केली आहे. ज्या ठिकाणी ईडीने छापेमारी केली आहे, त्या ठिकाणी तृणमूल काँग्रेसच्या महिला नेत्यांनी बंगालचे राज्यगीत गाऊन अनोख्या प्रकारे निषेध व्यक्त केला. ममता बॅनर्जी म्हणाल्या, “आमच्याशी लढायचे असेल तर, लोकशाही पद्धतीने आम्हाला पराभूत करा. यंत्रणेच्या मागे लपू नका.” तपास यंत्रणा निवडणूक आणि आपल्या पक्षाशी संबंधित महत्वाचे कागदपत्र आणि कॉम्प्युटर आणि हार्डडिस्क जप्त करत असल्याचा आरोप मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केला.काल ईडीने पश्चिम बंगालमध्ये I- PAC मध्ये छापेमारी केली होती. या छापेमारीनंतर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या आक्रमक झाल्या आहेत. त्यांनी छापेमारी सुरू असलेल्या ठिकाणी जाऊन त्या ठिकाणहूण पुरावे नेल्याचा आरोप ईडीने केला होता. तसेच याविरुद्ध ईडीने हायकोर्टात मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याविरुद्ध याचिका दाखल केली होती. त्यावर आज सुनावणी पार पडली आहे. या सुनावणीदरम्यान जोरदार खडाजंगी झाली असल्याचे समोर येत आहे.

ईडीने I-PAC चे प्रतीक जैन यांच्या कार्यालयावर छापेमारी केली. छापेमारी सुरू असतानाच मुख्यमंत्री ममता बॅनर्जी त्या ठिकाणी दाखल झाल्या. त्यानंतर ईडीने पश्चिम बंगाल सरकारवर आणि खुद्द मुख्यमंत्री पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर पुरावे नेल्याचा आरोप केला आहे. त्यानंतर ईडीने हायकोर्टात धाव घेतली होती. त्यावर आज सुनावणी पर पडली.ईडीने मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर पुरावे घेऊन गेल्याच तसेच तपासात अडथळा आणल्याबद्दल हायकोर्टात धाव घेतली.

### सुनावणी दरम्यान खडाजंगी

त्यावर आज कोर्टात सुनावणीदरम्यान खंडाजंगी झाली. त्यानंतर कोर्टाने सुनावणी पुढे ढकलली आहे. न्यायमूर्तींच्या खंडपीठाने याचिकेवरील पुढील सुनावणी 14 जानेवारी रोजी ठेवली आहे.याचिकेवर सुनावणी सुरु असतानाच कोर्टाच्या बाहेर देखील टीएमसीच्या कार्यकर्त्यांनी गोंधळ घातल्याचे समोर येत आहे.

# अपघातग्रस्तांना १.५ लाखांपर्यंत मोफत उपचार

## मदत करणाऱ्या ‘राहवीरांना’ मिळणार 25 हजारांचे बक्षीस

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**देशातील रस्ते सुरक्षा, परिवहन सुधारणा आणि नागरिक सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरीमंत्र्यांची एक महत्त्वाची राष्ट्रीय बैठक पार पडली. या बैठकीत रस्ते अपघातातील मृत्यूदर कमी करण्यासाठी आणि जखमींना तातडीने मदत मिळवून देण्यासाठी अनेक मोठ्या निर्णयांवर शिक्कामोर्तब करण्यात आले.**

बैठकीतील सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे ‘कॅशलेस ट्रीटमेंट स्कीम’. आता देशातील कोणत्याही रस्त्यावर अपघाताचा बळी ठरलेल्या व्यक्तीला अपघातानंतरच्या पहिल्या ७ दिवसांपर्यंत १.५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत (कॅशलेस) उपचार मिळतील. यापूर्वी ही योजना आसाम, चंदीगड, पंजाब आणि हरियाणा यांसारख्या राज्यांत यशस्वी ठरली असून, आता ती संपूर्ण देशात लागू केली जात आहे.अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीला तातडीने रुग्णालयात पोहोचवून त्याचे प्राण वाचवणाऱ्या नागरिकांचा सन्मान करण्यासाठी सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. अशा व्यक्तींना आता ‘राहवीर’ म्हटले



जाईल आणि त्यांना सरकारकडून २५,००० रुपयांचे प्रोत्साहनपर बक्षीस दिले जाईल.‘हिट अँड रन’ प्रकरणांमधील नुकसानभरपाईच्या रकमेतही मोठी वाढ करण्यात आली आहे. आता गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीला ५०,००० रुपये आणि मृत्यू झाल्यास वारसांना २ लाख रुपये नुकसानभरपाई दिली जाणार आहे. सध्या अशा प्रकरणांत क्लेम दाखल होण्याचे प्रमाण केवळ १७% असल्याने, राज्यांनी या योजनेबाबत अधिक जागरूकता पसरवावी, असे निर्देशही गडकरी यांनी दिले. गेल्या तीन महिन्यांत झालेल्या भीषण बस अपघातांनंतर सरकारने बसच्या डिझाइनबाबत कठोर नियम लागू केले आहेत. आता स्लीपर कोच बसेस केवळ नामांकित ऑटोमोबाईल कंपन्याच बनवू शकतील. सर्व बसेसमध्ये फायर डिटेक्शन, इमर्जन्सी एक्झिट, लायटिंग आणि ड्रायव्हरसाठी ‘ड्राउझीनेस अलर्ट’ (झोप येत असल्यास इशारा देणारी यंत्रणा) अनिवार्य असेल. शहरातील सर्व नवीन बसेस ‘लो-फ्लोर’ असतील, ज्यात रॅम्प, लिफ्ट आणि व्हीलचेअरची सोय असेल. नितीन गडकरी यांनी वाहनांच्या सुरक्षिततेसाठी V2V (व्हीकल-टू-व्हीकल) कम्युनिकेशन तंत्रज्ञानावर भर दिला आहे.

### ‘झिरो फेटॅलिटी’ जिल्ह्यांचे लक्ष्य

८० टक्क्यांपर्यंत अपघात रोखू शकतील. तसेच, आगामी संसद सत्रात मोटर वाहन कायद्यात (MOTOR VEHICLE ACT) ६१ नवीन सुधारणा प्रस्तावित केल्या जाणार आहेत.देशातील सर्वाधिक अपघात होणाऱ्या १०० जिल्ह्यांची यादी सरकारने जाहीर केली आहे. या जिल्ह्यांमध्ये ‘झिरो फेटॅलिटी डिस्ट्रिक्ट’ प्रोग्राम राबवला जाणार आहे.

# खुशी कपूर व वेदांग रैनाचं नातं संपलं



बॉलीवूडमध्ये सेलिब्रिटी व त्यांच्या वैयक्तिक आयुष्याची खूप चर्चा होत असते. कोण कोणाला डेट करतंय, याबद्दलही चाहत्यांमध्ये उत्सुकता पाहायला मिळते. बॉलीवूडचं लाडकं जोडपं तारा सुतारिया व वीर पहारिया यांचं ब्रेकअप झालंय, अशा चर्चा होत आहेत. याचदरम्यान आणखी एक सेलिब्रिटी कपल वेगळं झाल्याची बातमी समोर आली आहे. बोनी कपूर यांची धाकटी लेक, जान्हवी कपूरची धाकटी बहीण, अभिनेत्री खुशी कपूर व अभिनेता वेदांग रैनाचं ब्रेकअप झालंय, असं म्हटलं जात आहे. वेदांग व खुशी यांनी आपल्या नात्याची जाहिरपणे कबुली दिली नव्हती. पण दोघेही एकत्र व्हेकेशनला गेले होते, तसेच अनंत अंबानी व राधिका मर्चंटच्या लग्नात ते एकत्र आले होते. दोघे दोन वर्षे एकत्र होते, पण काही रिपोर्ट्समध्ये असा दावा केला जात आहे.

# टेलिव्हिजनबद्दल मानसी साळवीची प्रतिक्रिया

मराठी इंडस्ट्रीमध्ये बऱ्याचदा कलाकार मंडळी नाटक, मालिका आणि चित्रपटांमध्ये एकत्र काम करत असतात. तर हेच कलाकार ओटीटीवरील वेब सीरिजमध्येसुद्धा पाहायला मिळतात. पण, हिंदीमध्ये मात्र असं नसतं. हिंदी इंडस्ट्रीतील चित्र मराठीपेक्षा वेगळं आहे. मराठी मालिका विश्वामध्ये काम केलेले अनेक लोकप्रिय कलाकार पुढे मराठी चित्रपट, नाटक आणि वेब सीरिजमध्ये पाहायला मिळतात. हिंदी मालिका आणि वेब सीरिजमध्ये काम करणारे कलाकार मात्र फार क्वचितच मोठ्या पडद्यावर झळकतात. हिंदीमध्ये अनेकदा टेलिव्हिजनवर काम करणाऱ्या कलाकारांना मोठ्या संधी मिळत नाही आणि त्यांच्याकडे टेलिव्हिजनमधील कलाकार या दृष्टिकोनातूनच पाहिलं जातं, त्यामुळे अनेकदा कलाकार याबद्दल खंतही व्यक्त करत असतात. अशातच मराठमोळी अभिनेत्री मानसी साळवीनेही याबद्दल खंत व्यक्त केली आहे. मानसी साळवी मराठी व हिंदी इंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेत्री आहे. मानसीने मराठी मालिका व चित्रपटांमध्ये प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. यासह तिने अनेक हिंदी मालिकांमध्येही महत्त्वपूर्ण आणि खलनायिकेच्या भूमिका साकारल्या आहेत. सध्या अभिनेत्री तिच्या नवीन मालिकेमुळे चर्चेत आहे.मानसी साळवीने 'फ्री प्रेस जर्नल'शी संवाद साधताना टेलिव्हिजनमध्ये काम करणाऱ्या कलाकारांकडे त्याच दृष्टीने पाहिलं जातं, याबद्दल प्रतिक्रिया देत खंत व्यक्त केली आहे. मानसी म्हणाली, "जेव्हा माझ्याच क्षेत्रात काम करणारे लोक मोठी संधी मिळाल्यानंतर टेलिव्हिजनकडे वेगळ्या नजरेने पाहतात आणि पुन्हा कधीच टेलिव्हिजनवर काम न करण्याचा विचार नक्की करतात. तेव्हा मला खूप वाईट वाटतं."

# एकाच वेळी खाल्ले होते 40 समोसे

चित्रपटसृष्टीतील बहुतेक अभिनेत्री त्यांच्या फिटनेसची विशेष काळजी घेतात. चित्रपटांमध्ये चांगले दिसण्यासाठी त्यांना त्यांच्या डाएटची चांगली काळजी घ्यावी लागते. बॉलीवूडमधील सर्व अभिनेत्री फिटनेसमध्ये एकमेकांशी स्पर्धा करतात. स्वत:ची फिगर राखण्यासाठी या सुंदरी जिममध्ये तासन् तास घाम गाळतात आणि भरपूर डाएटदेखील करतात.पण, बॉलीवूडमध्ये अशी एक अभिनेत्री आहे, जिने एकाच वेळी ४० समोसे खाल्ले होते. पण, तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की, ती फिटनेसमध्ये मलायका अरोरालाही टक्कर देते. ही दुसरी-तिसरी कोणी नसून बॉलीवूडची स्टाईल आयकॉन सोनम कपूर आहे. ४० समोसे खाल्ल्यानंतरही सोनमच्या फिटनेसचे रहस्य काय आहे? हे रहस्य अभिनेत्रीने स्वतः सांगितले होते.सोनमने अनेकदा सांगितले आहे की, ती तिच्या डाएटची काळजी घेते आणि फिट दिसण्यासाठी जिममध्ये जाते. पण एकदा तिने सांगितले की, तिने ४० समोसे खाल्ले; पण हे कसे शक्य झाले?सोनम कपूर तिच्या 'द झोया फॅक्टर' या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी कपिल शर्माच्या शोमध्ये आली होती, त्यादरम्यान तिने एका वेळी ४० समोसे खाल्ल्याचे उघड केले. सोनमने सांगितले की, एक काळ असा होता की, जेव्हा ती स्थूल होती आणि खूप जंक फूड खात असे. ती लहान असताना तिने सुमारे ४० छोटे समोसे खाल्ले होते.शोमध्ये कपिल शर्माने सोनम कपूरला विचारले, "सोनम, तुझ्याबद्दल एक अफवा आहे की, तू एकदा ४० समोसे खाल्लेस." सोनमने हसून उत्तर दिले, "ते लहान लहान प्रकारचे समोसे होते? ज्यांना बेबी समोसेदेखील म्हणतात. मला ते आवडले




# मृण्मयी गोडबोलेच्या नवऱ्याला पाहिलंत का?

मृण्मयी गोडबोले मराठी इंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. मराठीसह तिने हिंदीतही महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. पण तुम्हाला माहीत आहे का, मृण्मयी गोडबोलेचा नवरा कोणत्या क्षेत्रात काम करतो. मृण्मयी गोडबोलेने चित्रपट, वेब सीरिजमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका साकारत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं. पण, तुम्हाला माहीत आहे का? मृण्मयी गोडबोलेचे वडील श्रीरंग गोडबोले मराठी चित्रपट सृष्टीतील लोकप्रिय दिग्दर्शक आहेत; तर तिचा भाऊ सुहृद गोडबोलेसुद्धा दिग्दर्शक आहे. यासह तिची वहिनी गिरिजा ओक मराठी व हिंदी इंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेत्री आहे. गोडबोले कुटुंबातील जवळपास सर्वजण मनोरंजन विश्वात सक्रिय आहेत. महत्त्वाचं म्हणजे मृण्मयी गोडबोलेचा नवरासुद्धा मनोरंजन क्षेत्रातच काम करत असून त्याला त्याच्या कामासाठी राष्ट्रीय पुरस्कारसुद्धा मिळाला आहे. मृण्मयी गोडबोलेच्या नवऱ्याबद्दल सांगायचं झालं, तर मृण्मयी गोडबोले लोकप्रिय दिग्दर्शक निखील महाजनची बायको आहे. निखील महाजन जितेंद्र जोशी व गौरी नलावडे यांच्या 'गोदावरी' या राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या चित्रपटाचा दिग्दर्शक आहे. पण, मृण्मयी व निखील एका क्षेत्रात सक्रिय असले तरीसुद्धा ते फार कमी वेळा एकत्र स्पॉट होतात.

# 'बिग बॉस'मध्ये पुन्हा जाणार का?

'बिग बॉ'स' हा एक लोकप्रिय रिॲलीटी शो आहे. फक्त हिंदीमध्येच नाही तर हा शो विविध भाषांमध्येदेखील प्रदर्शित होतो. मराठीमध्येही हा शो प्रेक्षकांच्या भेटीला येतो. नुकताच 'बिग बॉस' हिंदीचा १९ वा सीझन प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. गौरव खन्ना या सीझनचा विजेता ठरला. तर प्रणित मोरे, फरहाना भट्ट, तानिया मित्तल, अमाल मलिक अशा अनेक स्पर्धकांनी लक्ष वेधले. आता बिग बॉस मराठीचा सहावा सीझन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. ११ जानेवारीपासून हा शो प्रेक्षकांना कलर्स मराठीवर प्रदर्शित होणार आहे. आता काही प्रोमो पाहायला मित आहे. मात्र, हे



स्पर्धक नेमके कोण, हे मात्र अद्याप समोर आले नाही. बिग बॉस मराठीच्या सहाव्या सीझनमध्ये नेमके कोणते स्पर्धक असणार हे जाणून घेण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत.आता या सगळ्यात बिग बॉस १ पासून ते ५ व्या सीझनपर्यंत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांनी बिग बॉसच्या पार्टीला नुकतीच हजेरी लावली होती. यावेळी त्यांच्या लूकने लक्ष वेधले. तसेच, काहींची वक्तव्येदेखील चर्चेत आली आहेत.ज्येष्ठ अभिनेत्री उषा नाडकर्णींनी यावेळी लक्ष वेधले. राजश्री मराठीशी त्यांनी संवाद साधला. त्यावेळी त्यांना विचारले की जे बिग बॉसच्या घरात स्पर्धक येणार आहेत, त्या सगळ्यांना काय सल्ला द्याल? त्यावर उषा नाडकर्णी म्हणाल्या, "सल्ला देऊन काहीही होत नाही. तिकडे अशी परिस्थिती निर्माण होते की लोक त्याप्रमाणे वागतात." असे म्हणत सल्ला देऊन बिग बॉसमध्ये खेळता येत नाही, असे मत व्यक्त केले.पुढे त्यांना विचारले की पुन्हा बिग बॉसमध्ये जाण्याची संधी मिळाली तर जाणार का? यावर त्या म्हणाल्या, "अजिबात नाही", असे म्हणत त्यांनी स्पष्टपणे नकार दिला. उषा नाडकर्णी बिग बॉस मराठीच्या पहिल्या सीझनमध्ये सहभागी झाल्या होत्या. उषा नाडकर्णी आजपर्यंत अनेक चित्रपट आणि मालिका यांमधून प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. त्यांच्या भूमिकांचे आजही कौतुक होते. उषा नाडकर्णी अभिनयाबरोबरच त्यांच्या स्पष्टवक्तपणेसाठी ओळखल्या जातात.

## डी क्लर्कची निर्णायक खेळी

## पहिल्या मॅचमध्ये मुंबई इंडियन्सवर भारी ठरली RCB

# मुंबई इंडियन्सची परंपरा कायम!

## स्मृती मंधानाच्या टीमची कमाल






।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महिलांच्या क्रिकेटमधील सर्वात मोठी क्रिकेट लीग स्पर्धा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महिला प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेला दमदार सुरूवात झाली आहे. स्पर्धेतील पहिला सामना दोन्ही चॅम्पियन्स संघांमध्ये पार पडला. या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने मुंबई इंडियन्सला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं होतं. प्रथम फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने २० षटकांअखेर ६ गडी बाद १५४ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना नादीन डी क्लर्कने शेवटच्या षटकात तुफान फटकेबाजी केली आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला दमदार विजय मिळवून दिला.**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला हा सामना जिंकण्यासाठी १५५ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून सलामीला आलेल्या ग्रेस हॅरिसने ४ चौकार आणि १ षटकारासह २५ धावांची खेळी केली. तर स्मृती मानधना १८ धावांवर माघारी परतली. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेली दयालन हेमलताने अवघ्या ७ धावांवर माघारी परतली. स्फोटक फलंदाज ऋचा घोषकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा होती. पण ती देखील अवघ्या ६ धावा करत माघारी परतली. तर राधा यादव १ धाव करून माघारी परतली.या सामन्यात फलंदाजी करताना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला सुरूवातीला मोठे धक्के बसले होते. पण शेवटी नादीन डी क्लर्क खंबीरपणे उभी राहिली. तिने अर्धशतकी खेळी करून रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. तिने या डावात ६३ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान तिने ७ चौकार आणि २ षटकार खेचले. मुख्य बाब म्हणजे शेवटच्या षटकात १८ धावांची गरज असताना तिने ६,४,६,४ मारून विजय मिळवून दिला.या सामन्यात मुंबई इंडियन्सला नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीसाठी यावं लागलं होतं. प्रथम फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सला सुरूवातीलाच मोठे धक्के बसले होते. अमेलिया केर अवघ्या ४ तर नेट सिव्हर ब्रंटदेखील अवघ्या ४ धावा करत माघारी परतली. पण जी कमलिनी आणि हरमनप्रीत कौरने मिळून मुंबई इंडियन्सचा डाव सावरला. जी कमलिनीने ३२ धावांची खेळी केली. तर कर्णधार हरमनप्रीत कौरने २० धावा केल्या. शेवटी मधल्या फळीतील फलंदाज निकोला कॅरीने ४० आणि सजना सजीवनने ४५ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर मुंबई इंडियन्सने २० षटकांअखेर ६ गडी बाद १५४ धावा केल्या.WPL मधील पहिल्याच सामान्यात सजीवना सजनाच्या धमाकेदार खेळीमुळे मुंबई इंडियन्सने २० षटकांत ६ बाद १५४ धावा केल्या. लॉरेन बेलने आरसीबीसाठी चांगली सुरुवात केली. आरसीबीच्या चुरशीच्या गोलंदाजीमुळे, मुंबई ११ षटकांत ४ गडी गमावून फक्त ६७ धावा करू शकली. परंतु त्यानंतर निकोला केरी आणि सजीवन सजनाने एका टोकावरून फटकेबाजी केली. सजीवन सजनाने २५ चेंडूत ४५ धावा केल्या, तर निकोलाने २९ चेंडूत ४० धावा केल्या. या दोन डावांमुळे मुंबईला त्यांचे रक्षण करता येईल असे लक्ष्य गाठता आले. बंगळुरूकडून लॉरेल बेलने चांगली गोलंदाजी केली, ४ षटकात १ मेडन टाकले आणि १४ धावांत १ बळी घेतला. सजनाला ४ धावांवर जीवदान मिळाले आणि आता ती त्याचा फायदा घेत आहे. तत्पूर्वी, आरसीबीची कर्णधार स्मृती मानधनाने नाणेफेक जिंकली आणि मुंबईला फलंदाजीसाठी आमंत्रित केले. नाणेफेक १५ मिनिटे आधीच झाली. त्यानंतर उद्घाटन समारंभ झाला, जिथे हरनाज, जॅकलिन आणि हनी सिंग यांनी त्यांच्या कामगिरीने चाहत्यांना मंत्रमुग्ध केले.आरसीबीला विजयासाठी शेवटच्या षटकात १८ धावांची तोल गेला, परंतु नंतर डी क्लार्कने सलग चार चेंडूत दोन षटकार आणि दोन चौकार मारून सामना आरसीबीच्या बाजूने केला.

### डी क्लर्क ठरली हिरो

तो डळमळीत झाला. एका क्षणी आरसीबीचा अर्धा संघ ६५ धावांवर बाद झाला. त्यानंतर क्लार्कने अरुंधती रेड्डी (२०) सोबत सहाव्या विकेटसाठी अर्धशतकी भागीदारी करून डाव सावरला आणि विजयाचा मार्ग मोकळा केला. आरसीबीकडून सलामीवीर ग्रेस हॅरिसने २५ धावा आणि स्मृती मानधनाने १८ धावा केल्या. मुंबईकडून निकोला केरी आणि अमेलिया केर यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. नॅट सायव्हर ब्रंट, शबनम इस्माइल आणि अमनजोत कौर यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

## पहिल्याच सामन्यात विराट इतिहास घडवणार?

## विराट कोहलीकडे सचिनचा मोठा विक्रम मोडून काढण्याची संधी







।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय संघाचा स्टार फलंदाज विराट कोहली न्यूझीलंडविरुद्धच्या आव्हानासाठी सज्ज झाला आहे. भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका होणार आहे. काही दिवसांपूर्वी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या मालिकेत त्याने लागोपाठ शतकं झळकावली होती.**

त्यानंतर विजय हजारे ट्रॉफीतही त्याच्या फलंदाजीचा बोलबाला पाहायला मिळाला होता. दरम्यान न्यूझीलंडविरुद्ध होणाऱ्या वनडे मालिकेत त्याला सचिन तेंडुलकरचा मोठा विक्रम मोडून काढण्याची संधी असणार आहे.विराट कोहलीने कसोटी आणि टी -२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. त्यामुळे तो केवळ एकच फॉरमॅट खेळत आहे. पण एक फॉरमॅट खेळत असूनही त्याच्या फलंदाजीतील धार कमी झालेली नाही. ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर त्याला हवी तशी कामगिरी करता आली नव्हती. पण त्यानंतर दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत त्याने लागोपाठ शतकं आणि १ अर्धशतक झळकावत दमदार पुनरागमन केलं. आता न्यूझीलंडविरुद्ध होणाऱ्या मालिकेतही त्याच्याकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा असणार आहे. विराटने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आतापर्यंत २७,९७५ धावा केल्या आहेत. त्याला २८,००० धावांचा पल्ला गाठण्यासाठी अवघ्या २५ धावांची गरज आहे. विराट न्यूझीलंडविरुद्ध ३ वनडे सामन्यांची मालिका खेळणार आहे. या ३ सामन्यांमध्ये किंवा जुलै महिन्यात इंग्लंडविरुद्ध होणाऱ्या सामन्यातही त्याने या २५ धावा केल्या तरीदेखील तो सचिनचा मोठा विक्रम मोडून काढू शकतो.

### २८,००० धावांचा पल्ला गाठणार ?

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद २८,००० धावांचा पल्ला गाठणारा विराट पहिलाच फलंदाज ठरू शकतो. या यादीत अव्वल स्थानी असलेल्या सचिन तेंडुलकरने ६४४ डावात २८,००० धावांचा पल्ला गाठला होता. तर विराटने आतापर्यंत ६२३ डावात २७,९७५ धावा केल्या आहेत. त्यामुळे २५ धावा करताच तो सर्वात जलद २८,००० धावा करणारा फलंदाज ठरू शकतो.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। शनिवार ।
दि. 10 जानेवारी 2026

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## महिलांच्या सक्षमीकरणासाठी ‘होम इंडस्ट्री’चे मॉडेल

# महिला सक्षमीकरण आणि रोजगारावर लक्ष केंद्रित करणारी “आशा”

## “प्रत्येक महिलेच्या हाताला काम आणि सन्मानाचे आयुष्य” देण्याचा संकल्प जाहीर



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्र. १६ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजितदादा गट) अधिकृत उमेदवार आशाताई भोंडवे यांनी प्रचारात जोरदार पाऊल टाकले आहे. किवळे येथील शिवशंभो कॉलनी परिसरात झालेल्या प्रचार दौऱ्यात त्यांनी महिलांशी संवाद साधताना “प्रत्येक महिलेच्या हाताला काम आणि सन्मानाचे आयुष्य” देण्याचा संकल्प जाहीर केला. स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, निवडणूक आता जनतेच्या हाती गेल्याचे स्पष्ट दिसत आहे.**

### महिलांच्या सक्षमीकरणासाठी ‘होम इंडस्ट्री’चे मॉडेल

आशाताई भोंडवे म्हणाल्या, “महिलांसाठी केवळ मेळावे न भरवता, बचत गटांच्या माध्यमातून प्रत्येक घरी लघुउद्योग सुरू करण्याचे आमचे नियोजन आहे. महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाली तरच कुटुंब सावरते.” त्यांनी आशा फाउंडेशनच्या माध्यमातून महिलांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासह महिला सुरक्षालाही तितकेच महत्त्व दिले.

### सत्ताधाऱ्यांच्या कामगिरीचा हिशोब जनतेकडून

भोंडवे यांनी गेल्या पाच वर्षांत झालेल्या विकासकामांवर भाष्य करत ठणकावून सांगितले की, “ही निवडणूक फक्त विकासाच्या मुद्द्यावर लढली जात आहे. पूर्वीच्या नगरसेवकांनी काय कामे केली, हे आता जनतेला





उमजले आहे. मी मत मागण्यासाठी नाही, तर तुमच्या समस्या जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्याचे वचन देण्यासाठी आलो आहे.”

### तरुण आणि ज्येष्ठांसाठी खास योजना

भोंडवे यांनी तरुणांसाठी करिअर संधी आणि ज्येष्ठांसाठी शासकीय योजनांचा लाभ थेट घरापर्यंत पोहोचवण्याचे आश्वासन दिले. भोंडवे कुटुंबाच्या सामाजिक कार्याचा उल्लेख करत स्थानिक नागरिकांनी त्यांना “अजितदादांचा खंदा शिलेदार” म्हणून गौरवले.

> “आज बबनराव भोंडवे यांचा समाजकारणाचा वारसा पुढे नेताना मला अभिमान वाटतोय. मी स्थानिक कन्या असून लोकांच्या अडीअडचणींची मला पूर्ण जाण आहे. राजकारण माझ्यासाठी समाजसेवेचे साधन आहे. प्रभाग १६ चा कायापालट करणे हेच माझे एकमेव ध्येय आहे.” **–आशाताई भोंडवे,** उमेदवार, राष्ट्रवादी, प्रभाग- 16.

> “आम्ही अनेक उमेदवार पाहिले, पण आशाताईंमध्ये आम्हाला आपलेपण वाटते. त्या निवडणुकीपुरत्या नाहीत, तर अगोदरच लोकांच्या सुख-दुःखात धावून येतात. त्यांच्या कामाची पद्धत आणि दांडगा जनसंपर्क पाहता, यावेळी आम्ही त्यांनाच विजयी करण्याचा निर्णय घेतला आहे.”
>
> **–विठ्ठलराव जगताप, स्थानिक रहिवासी.**

## सुलक्षणा शिलवंत- धर यांची

# SRA आणि शहरविकासाबाबत ठाम भूमिका!

### मिशन- PCMC : राष्ट्रवादीच्या “तुतारीला” नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज




**पिंपरी-चिंचवड | पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रभाग क्रमांक 20, संत तुकाराम नगर येथून सुलक्षणा शिलवंत धर यांनी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या “तुतारी” चिन्हावर निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. त्यांनी प्रचारात आघाडी घेतली असून, सामान्य नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.**

घरांच्या पुनर्विकासावरून त्या म्हणाल्या, “SRA म्हणजे फक्त घरांचा प्रश्न नाही, तो संमती, विश्वास आणि न्यायाचा प्रश्न आहे. दबावाने घेतलेली संमती नव्हे; बहुसंख्य लोकांच्या विश्वासातूनच SRA उभं राहायला हवं.” त्या म्हणाल्या की घर ही दया नव्हे, तर गरीबांचा हक्क आहे. “ज्यांचा हक्क आहे, तेच घर मिळवणार. ही लढाई इथेच थांबणार नाही,” असे त्यांनी ठामपणे सांगितले.

घर विकताना नागरिकांना दिलेली स्वप्नं फक्त कागदावर न राहता प्रत्यक्षात येण्याची गरज आहे, असेही त्यांनी नमूद केले. थेट रस्ता, स्वच्छ हवा आणि सुरक्षित परिसर ही लक्झरी नव्हे, तर नागरिकांचा मूलभूत हक्क आहे, असे डॉ. शिलवंत धर यांनी सांगितले. त्यांनी जोर देऊन म्हटले, “विकास म्हणजे इमारती नव्हे, सन्मानाचं जगणं. हेच माझं वचन.”

फेरीवाल्यांबाबतच्या परिस्थितीवरही त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. “आम्ही फेरीवाल्यांच्या विरोधात नाही; अव्यवस्थेच्या विरोधात आहोत. ORGANISED HAWKER ZONE म्हणजे फेरीवाल्यांना सन्मानाची जागा आणि नागरिकांसाठी मोकळे रस्ते,” असे त्यांनी सांगितले.

त्याचबरोबर, शहरातील साफसफाई आणि पायाभूत सुविधा सुधारणेबाबतही त्यांनी महत्त्वाची माहिती दिली. “तात्पुरती साफसफाई नव्हे; मूळ समस्येवर कायमचा उपाय हवा. ड्रेनेज आणि स्टॉर्म वॉटर लाईन्स लोकसंख्येनुसार मजबूत केल्या जातील, जेणेकरून चोकअप होणार नाही आणि सुरक्षित निचरा मिळेल,” असे डॉ. शिलवंत धर म्हणाल्या.

> घर ही दया नाही, हक्क आहे; सुरक्षित रस्ता, स्वच्छ हवा आणि सन्मानाचं जीवन हे प्रत्येक नागरिकासाठी न थांबणारा हक्क आहे. विकास म्हणजे केवळ इमारती नव्हेत, तर कायमचा दिलासा आणि समान संधी.
>
> **–सुलक्षणा शिलवंत-धर,**
> उमेदवार, राष्ट्रवादी शरद पवार पक्ष, प्रभाग- क्रमांक- 20.

शहर विकासाच्या दृष्टिकोनातून त्या म्हणाल्या, “विकास म्हणजे मलमपट्टी नाही, कायमचा दिलासा. व्यवस्थित शहर, सुरक्षित रोजगार आणि सर्वांसाठी दिलासा – हेच माझं ध्येय आहे.”

---

## सुरेश तात्या म्हेत्रे यांचे प्रभाग क्रमांक १ मध्ये अनुभवी नेतृत्व!

### मिशन- PCMC : चिखली परिसरात भाजपाच्या पॅनेलची आघाडी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपरी-चिंचवड | भोसरी विधानसभा मतदारसंघातील प्रभाग क्रमांक १ मध्ये आगामी काळातील विकासाचे व्हिजन पाहता, आमदार महेश दादा लांडगे यांचे कट्टर समर्थक सुरेश तात्या म्हेत्रे यांच्या नावाची जोरदार चर्चा नागरिकांमध्ये सुरू झाली आहे. अनुभव, चारित्र्य आणि शिक्षण या सर्व गुणांनी समृद्ध म्हेत्रे यांना प्रभागातील सर्वांगीण विकासासाठी योग्य नेतृत्व मानले जात आहे.**

प्रभावी जनसंपर्क आणि उत्तम वक्तृत्व यामुळे प्रभागातील नागरिकांशी त्यांचे अतूट नाते निर्माण झाले आहे. आमदार महेश दादा लांडगे यांनी चिखली आणि परिसराचा कायापालट करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला असून, प्रभागातील पाच डीपी रस्त्यांचे काम प्रगतीपथावर सुरू आहे. तसेच चिखली जलशुद्धीकरण प्रकल्प, टाऊन हॉल, संतपीठ, शाळा आणि अंतर्गत रस्त्यांचे जाळे विणण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

प्रशासकीय अनुभव आणि आमदारांशी असलेले निकटचे संबंध यामुळे प्रभागातील सोसायट्यांचे प्रश्न आणि नागरी समस्या मार्गी लावण्यासाठी सुरेश तात्या म्हेत्रे हेच सक्षम पर्याय असल्याचे नागरिकांचे मत आहे. प्रभाग क्रमांक १च्या सर्वांगीण विकासासाठी अनुभवी नेतृत्वाची गरज असल्याची भावना लोकांमध्ये दिवसेंदिवस वाढत आहे.

सुरेश तात्या म्हेत्रे यांच्या प्रचाराला नागरिकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत असून, चिखली परिसरातील लोकांचा विश्वास आहे की, म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखाली आमदार महेश दादा लांडगे प्रभागातील विकासकामांची गती कायम राखतील. सध्या प्रभागातील नागरिक सुरेश तात्या म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखाली येणाऱ्या सुधारणा आणि विकासाच्या कामांसाठी उत्सुकतेने वाट पाहत आहेत.

### महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले

# प्रभाग क्रमांक 5 मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची प्रचारात आघाडी!

## अजित गव्हाणे यांच्या नेतृत्वाखाली सोसायट्यांमध्ये स्नेहमेळाव्यांचा धडाका!

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात राजकीय वातावरण तापू लागले असून, प्रभाग क्रमांक ५ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने (अजित पवार गट/शरद पवार गट – तुमच्या पक्षानुसार बदलू शकता) प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. शहराचे खंबीर नेतृत्व अजितभाऊ गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवडणूक अत्यंत आत्मविश्वासाने लढली जात असून, त्यांच्या कार्याचा धबधबा प्रभागात स्पष्टपणे दिसून येत आहे.**



#### गावभेटी आणि कोपरा सभांवर भर

प्रचाराच्या दुसऱ्या टप्प्यात आज राष्ट्रवादीच्या वतीने 'गावभेट' दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. प्रभाग ५ मधील चारही उमेदवार प्रियंका बारसे, भीमाताई (काकी) फुगे, अमर फुगे आणि राहुल गवळी हे सर्व स्थानिक उमेदवार असल्याचा मोठा फायदा त्यांना मिळत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या उमेदवारांचे प्रभागातील जनतेशी अतूट नाते आणि सामाजिक कार्यातील सक्रिय सहभागामुळे मतदारांमध्ये त्यांच्याबद्दल मोठी आपुलकी दिसून येत आहे

#### सोसायटी धारकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

आजच्या प्रचार दौऱ्यात प्रामुख्याने क्षितिज सोसायटी, रामनगरी हौसिंग सोसायटी, प्रकृती हाईट्स, ईशान्य सोसायटी आणि गव्हाणे इस्टेट या भागांत स्नेहमेळावे पार पडले. यावेळी गृहनिर्माण सोसायट्यांमधील नागरिकांनी उमेदवारांचे जंगी स्वागत केले. "आम्ही स्थानिक प्रश्नांची जाण असलेले उमेदवार आहोत, त्यामुळे मायबाप जनता आम्हाला नक्कीच भरभरून मतदान करेल," असा विश्वास यावेळी उमेदवारांनी व्यक्त केला.

#### स्थानिक नेतृत्वाची ताकद

प्रभागातील रखडलेली विकासकामे, पाणीप्रश्न आणि स्वच्छता या मुद्द्यांवर राष्ट्रवादीच्या उमेदवारांनी आपले व्हिजन मांडले. अजितभाऊ गव्हाणे यांच्या नेतृत्वाखालील ही 'चौकडी' प्रभागाचा कायापालट करेल, अशी भावना मतदारांमधून व्यक्त होत आहे.

" आशीर्वाद आमच्या पाठीशी आहे आणि आम्ही ही निवडणूक बहुमताने जिंकू," अशी ग्वाही यावेळी प्रचारात सहभागी कार्यकर्त्यांनी दिली.

# वारं फिरलं तुषार सहानेंना नागरिकांची पसंती

## प्रभाग 8 जय गणेश साम्राज्य केंद्रीय विवाह परिसरात राष्ट्रवादी उमेदवारांना प्रतिसाद

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी विधानसभा मतदारसंघातील प्रभाग क्रमांक १ मध्ये आगामी काळातील विकासाचे व्हिजन पाहता, आमदार महेश दादा लांडगे यांचे कट्टर समर्थक सुरेश तात्या म्हेत्रे यांच्या नावाची जोरदार चर्चा नागरिकांमध्ये सुरू झाली आहे. अनुभव, चारित्र्य आणि शिक्षण या सर्व गुणांनी समृद्ध म्हेत्रे यांना प्रभागातील सर्वांगीण विकासासाठी योग्य नेतृत्व मानले जात आहे.**



### इंद्रायणी नगरची सुसंस्कृत ओळख पुन्हा मिळवणार; आरोग्य कार्डाच्या माध्यमातून ज्येष्ठांच्या आरोग्याची घेणार जबाबदारी

पिंपरी-चिंचवड: भोसरी विधानसभा मतदारसंघातील प्रभाग क्रमांक ८ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार तुषार सहाणे यांच्या प्रचाराने वेग घेतला असून, जय गणेश साम्राज्य आणि केंद्रीय विहार परिसरात त्यांना नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळत आहे. "प्रभागात आता परिवर्तनाचे वारे वाहत असून, तुषार सहाणे यांचा विजय निश्चित आहे," असा विश्वास स्थानिक नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

#### महिला आणि ज्येष्ठांचा मोठा सहभाग

प्रचारादरम्यान महिलांची उपस्थिती लक्षवेधी ठरली. राज्य सरकारच्या 'लाडकी बहीण' योजनेचा सकारात्मक प्रभाव महिलावर्गावर दिसून येत असून, राष्ट्रवादीच्या पॅनेलला पसंती मिळत आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी तुषार सहाणे यांनी जाहीर केलेल्या 'आरोग्य सहाय्य कार्ड' संकल्पनेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### ज्येष्ठांसाठी खास आरोग्य आणि सुविधांचा संकल्प

निवडून आल्यानंतर ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी तुषार सहाणे यांनी महत्त्वाची आश्वासने दिली आहेत:

आरोग्य कार्ड: प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाला विशेष आरोग्य कार्ड दिले जाईल.

मोफत तपासणी: वर्षातून दोन वेळा संपूर्ण शरीराची मोफत आरोग्य तपासणी.

भक्ती आणि मनोरंजन: दरवर्षी ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत देवदर्शन सहल आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन.

सामाजिक उपक्रम: ज्येष्ठांच्या सक्रियतेसाठी विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची आखणी.

## भाजपा पॅनलची भव्य पदयात्रा!

# वाकड गावठाणातून विजयाचा संकल्प!

### मिशन-PCMC : श्रुती राम वाकडकर यांच्या नेतृत्वाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**वाकड, ताथवडे, पुनावळे प्रभाग क्रमांक २६ मधील भारतीय जनता पक्षाच्या पॅनलच्या प्रचाराचा शुभारंभ वाकड गावठाणातील ग्रामदैवत श्री म्हातोबा महाराज मंदिरात नारळ वाढवून करण्यात आला. श्रद्धा, संस्कार आणि विकासाचा संकल्प एकत्र आणत काढण्यात आलेल्या या भव्य पदयात्रेने संपूर्ण परिसरात उत्साहाचे व परिवर्तनाचे वातावरण निर्माण केले.**



या पदयात्रेत भाजपा पॅनलच्या उमेदवार श्रुती राम वाकडकर, राहुल कलाटे, कुणाल वाव्हळकर, रेश्मा भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्ते, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक, व्यापारी आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. पदयात्रेदरम्यान श्रुती राम वाकडकर यांनी नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. "विकासासाठी विश्वास, विश्वासासाठी सेवा" हा संदेश घेऊन निघालेल्या पदयात्रेला नागरिकांकडून ठिकठिकाणी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. फुलांची उधळण, घोषणा आणि ढोल-ताशांच्या गजरात परिसर दुमदुमून गेला.

वाकड गावठाण परिसरातील म्हातोबा मंदिर, दत्त मंदिर रोड, उत्कर्ष चौक, माऊली चौक, वाकड पोलीस स्टेशन, काळा खडक रोड मार्गे कै. तानाजीभाऊ तुकाराम कलाटे उद्यानापर्यंत प्रचार यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी चेतन भुजबळ, राम वाकडकर, विशाल आप्पा कलाटे, भारती ताई विनोदे, राजाभाऊ भुजबळ, वसंत कलाटे, गुलाब कलाटे, भरत आल्हाट, बाळासाहेब विनोदे, मोहनदादा भूमकर, हुषारशेठ भुजबळ, प्रकाश जमदाडे, शांताराम विनोदे, संपत विनोदे, राजू करपे, गबल वाकडकर, कांतिलाल भूमकर, संतोष पवार, लक्ष्मण मोहिते, अरुण वाकडकर, नरहरी वाकडकर, किसन वाकडकर, अनिल भुजबळ, विठ्ठल भुजबळ, अशोक भुजबळ, प्रवीण गायकवाड, नवनाथ ताजणे, भानुदास कुदळे उपस्थित होते.

> "वाकड, ताथवडे, पुनावळे गावांची संस्कृती जपत आधुनिक विकास, आणि प्रत्येक घरापर्यंत सुविधा हा माझा संकल्प आहे," परंपरा आणि प्रगतीचा संगम ग्रामदैवताच्या चरणी नतमस्तक होत सुरू झालेली ही पदयात्रा केवळ प्रचार नव्हता, तर परंपरा, संस्कार आणि प्रगती यांचा संगम अन विकासाची नांदी ठरणार आहे. मुख्यमंत्री मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग क्रमांक २६ चा सुनियोजित विकास साधण्यासाठी कटीबद्ध आहे.
>
> **–श्रुती राम वाकडकर,** भाजपा उमेदवार प्रभाग क्रमांक २५.

श्रुती राम वाकडकर विकासाचा चेहरा, विश्वासाचं नेतृत्व सामान्य कुटुंबातून पुढे आलेल्या, सामाजिक कार्याची ठाम पायाभरणी असलेल्या श्रुती वाकडकर यांनी वाकड, ताथवडे व पुनावळे परिसरातील नागरी प्रश्नांना नेहमीच प्राधान्य दिले आहे. पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य सुविधा, महिला-सुरक्षा, युवकांसाठी संधी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी सुविधा या मुद्द्यांवर त्यांची स्पष्ट भूमिका व सातत्यपूर्ण कामगिरी हीच त्यांची खरी ओळख आहे. त्यामुळेच "काम करणारी, ऐकणारी आणि सोडवणारी उमेदवार" अशी ओळख त्यांना नागरिकांनी दिली आहे.

---

## चऱ्होली बु. प्रभाग क्र. ३ मध्ये भाजप उमेदवारांच्या गाठीभेटींना उत्स्फूर्त प्रतिसाद

### डुडुळगाव येथील अडबंगनाथ महाराज मंदिरातून प्रचाराचा शुभारंभ

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या रणधुमाळीत चऱ्होली बु. प्रभाग क्रमांक ३ मध्ये भारतीय जनता पार्टी व महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार वेग घेत असून, आज दिवसभर झालेल्या गाठीभेटींच्या माध्यमातून मतदारांशी थेट संवाद साधण्यात आला. प्रचाराचा शुभारंभ डुडुळगाव येथील अडबंगनाथ महाराज मंदिरात दर्शन व पूजन करून करण्यात आला.**




> चऱ्होलीच्या सर्वांगीण विकासासाठी सुरू केलेली प्रत्येक कामे ठरलेल्या वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण केली जातील. मूलभूत सुविधा, सक्षम पायाभूत व्यवस्था आणि प्रत्येक घटकाला न्याय देणारे प्रशासन देणे हीच माझी प्राथमिकता असून नागरिकांनी दिलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही."
>
> **–नितीन काळजे,** माजी महापौर व उमेदवार, प्रभाग क्र. ३, चऱ्होली.

या प्रचारात माजी महापौर व उमेदवार मा. नितीनआप्पा काळजे, भाजप शहर कोषाध्यक्ष सचिनभाऊ श्रीधर तापकीर, सर्वसाधारण महिला गटातील उमेदवार सौ. अर्चनाताई राजेश सस्ते तसेच अनुसूचित जाती महिला प्रवर्गातील उमेदवार सौ. सारिका रवींद्र गायकवाड यांनी नागरिकांच्या घरोघरी जाऊन गाठीभेटी घेतल्या. ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक, व्यापारी व कामगार वर्गाशी थेट संवाद साधत त्यांचे प्रश्न, अडचणी आणि अपेक्षा जाणून घेण्यात आल्या.

डुडुळगाव, चऱ्होली गावठाण, वाड्या-वस्त्या तसेच अंतर्गत परिसरात दिवसभर प्रचार फेरी काढण्यात आली. अनेक ठिकाणी नागरिकांनी उमेदवारांचे मनापासून स्वागत करत विकासकामांबाबत समाधान व्यक्त केले. मागील दहा वर्षांत चऱ्होली बु. परिसरात झालेला सर्वांगीण विकास हा गाठीभेटींमध्ये नागरिकांच्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरला.

भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच माजी महापौर नितीनआप्पा काळजे यांच्या कार्यकाळात रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, आरोग्य व नागरी सुविधा यामध्ये झालेल्या सुधारणांमुळे परिसराचा कायापालट झाल्याचे नागरिकांनी आवर्जून सांगितले. "विकास कामांची गती अशीच सुरू राहावी," अशी अपेक्षा मतदारांनी व्यक्त केली.

गाठीभेटीदरम्यान बोलताना नितीनआप्पा काळजे म्हणाले, "चऱ्होलीच्या सर्वांगीण विकासासाठी सुरू केलेली कामे अधिक गतीने पूर्ण करणे हीच माझी जबाबदारी आहे. नागरिकांनी दाखवलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही. मूलभूत सुविधा, दर्जेदार पायाभूत कामे आणि प्रत्येक घटकाला न्याय देणारे प्रशासन हेच माझे ध्येय राहील." या प्रचारादरम्यान चऱ्होली मंडळातील भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला भगिनी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. येत्या १६ तारखेला भारतीय जनता पार्टीच्या चारही उमेदवारांवर विजयाचा गुलाल उधळला जाईल, असा ठाम विश्वास नागरिकांनी गाठीभेटीत व्यक्त केला.

# स्वच्छ व सुंदर पिंपरीसाठी
# राष्ट्रवादी काँग्रेसच्या पॅनेलला विजयी करा; डब्बू आसवानी

## प्रभाग 21 मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांची प्रचारफेरी, नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**स्वच्छ व सुंदर पिंपरी घडवण्यासाठी प्रभाग क्रमांक २१ मधून राष्ट्रवादी काँग्रेसच्या संपूर्ण पॅनेलला विजयी करण्याचे आवाहन माजी उपमहापौर तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार डब्बू आसवानी यांनी केले. केले.**



पिंपरी गावातील प्रभाग क्रमांक २१ मधील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार संदीप वाघेरे, डब्बू आसवानी, प्रियंका कुदळे व निकिता कदम यांच्या प्रचारार्थ पिंपरी कॅम्पातील सी-ब्लॉक, शनी मंदिर, वैष्णव देवी परिसरात प्रचारफेरी काढण्यात आली. या प्रचारफेरीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या वेळी माजी सभापती संतोष कुदळे, माजी नगरसेवक रंगनाथ कुदळे, हनुमंत नेवाळे, श्रीरंग शिंदे, मीना नानेकर, गिरिजा कुदळे, रुपेश कुदळे, कल्पना घाडगे, ज्योती साठे, अनिता मोईकर, सोनाली कुदळे, माधुरी कुदळे यांच्यासह राकेश मोरे, गणेश कुदळे, कुणाल सातव, रवींद्र कदम, अमोल गव्हाणे, शेखर अहिरराव, बाळासाहेब रोकडे, विष्णू माने, सतीश घोडेराव, प्रफुल्ल ओव्हाळ, अनिल जोगदंड, सुनील जगताप, रमेश मीराणी, किचू बन्साळी, रमेश बजाज, हरेश चुगानी, घनश्याम बजाज, सुरेश परदेशी, अजय गुप्ता, नीरज चावला आदी पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

यावेळी बोलताना डब्बू आसवानी म्हणाले, उपमहापौर व नगरसेवक म्हणून कार्यरत असताना संदीप वाघेरे यांच्यासोबत प्रभागात काँक्रीटचे रस्ते, सबवे यांसारखी विकासकामे करण्यात आली. पिंपरी गाव व कुदळे कॉलनी परिसरात नवीन पाणी कनेक्शन देण्यात आले. मिलिंदनगर येथील स्मशानभूमीत गॅस दाहिनी सुविधा अंतिम टप्प्यात असून, निवडणूक आचारसंहितेमुळे उद्घाटन रखडले आहे. येत्या पाच वर्षांत मतदारसंघातील सर्व रस्ते सिमेंट काँक्रीटचे करून प्रभागाचा सर्वांगीण कायापालट करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, संदीप वाघेरे यांनी २०१७ पासून नगरसेवक म्हणून केलेल्या विकासकामांचा आढावा घेतला. मिलिटरी डेअरी फार्म परिसरात ६ हजार वृक्षारोपण, डेरी फार्म उड्डाणपुलाचा प्रश्न मार्गी लावणे, पवना नदी सुधार प्रकल्पासाठी केलेले प्रयत्न, छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाचे काम पूर्ण करणे, पिंपरी गावचे ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ मंदिराचे नूतनीकरण, पिंपरी वाघेरे गाव ते पिंपळे सौदागरदरम्यान नदीवरील पुलाचे रुंदीकरण तसेच कोरोना काळात जिजामाता रुग्णालयाला वैद्यकीय उपकरणांची मदत यांचा त्यांनी उल्लेख केला. स्वच्छता, विकास आणि लोकहिताची कामे पुढे नेण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पॅनेलला मतदारांनी भरघोस पाठिंबा द्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# खान्देश रहिवासी संघाचा प्रभाग ५ मधील भाजप उमेदवारांना जाहीर पाठिंबा

## मिशन- PCMC : सर्व समाजघटकांना सोबत घेवून काम करु : कविता भोंगाळे

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड | शाकंभरी पौर्णिमेच्या शुभ प्रसंगी भोसरी येथील दुर्वांकुर लॉन्समध्ये खान्देश रहिवासी संघाच्या वतीने भव्य भक्तीगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात धुळे, शिरपूर आणि पुणे येथील सुप्रसिद्ध कलाकार सागर देशमुख, दिलीपभाऊ बाशिंगे, राम-श्याम बाशिंगे यांच्यासह गोल्डन बँड 'कानुबाई फ्रेंड्स सर्कल' यांनी कानुबाई मातेवरील भक्तीगीतांचे सादरीकरण केले, ज्यामुळे उपस्थितांची मनं मंत्रमुग्ध झाली.**




> आम्ही खान्देश समाजाच्या प्रत्येक गरजेशी नेहमी हाकेसरशी उभे राहू. विकासासाठी कोणतीही संधी वाया जाणार नाही, आणि प्रत्येक निर्णय समाजाच्या भल्यासाठी घेण्यात येईल.
> **–कविता भोंगाळे,** उमेदवार, भाजपा, प्रभाग- 5."

कार्यक्रमात खान्देशातील विविध समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या प्रसंगी खान्देश रहिवासी संघाच्या वतीने भोसरी परिसरातील प्रभाग क्रमांक ५ मधील भारतीय जनता पक्षाच्या सर्व उमेदवारांना जाहीर पाठिंबा देण्यात आला. हा पाठिंबा भोसरी शहराचे कार्यसम्राट आमदारांचे बंधू व कामगार नेते सचिनभैय्या लांडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर करण्यात आला.

कार्यक्रमात जालिंदर बापू शिंदे, सागरभाऊ गवळी, कविता भोंगाळे आणि अनुराधा गोफणे यांनी आपली मनोगते व्यक्त करत विकासाभिमुख नेतृत्वाला पाठिंबा देण्याचे आवाहन केले. त्यांनी आगामी ५० वर्षांच्या विकासाचा दूरदृष्टीपूर्ण आराखडा मांडून प्रभागातील विविध सुरू असलेल्या विकासकामांची माहिती उपस्थितांना दिली.

"आम्ही खान्देश समाजाच्या प्रत्येक गरजेशी नेहमी हाकेसरशी उभे राहू. विकासासाठी कोणतीही संधी वाया जाणार नाही, आणि प्रत्येक निर्णय समाजाच्या भल्यासाठी घेण्यात येईल." असे आश्वासन कविता भोंगाळे यांनी दिले.

प्रभागातील चारही भाजप उमेदवारांनी खान्देश समाजबांधवांसाठी सदैव सेवा देण्याची ग्वाही दिली. यावेळी पिंपरी-चिंचवड विकास मंडळाचे अध्यक्ष तसेच भाजप ओबीसी मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस मनोजजी ब्राम्हणकार यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित खान्देशवासीयांच्या वतीने पिरनभाऊ गवळी, गोकुळ सोनजे, सोमनाथ महाजन, शामभाऊ माळी, राजेंद्र अमृतकार, मकरंदभाऊ खैरनार, प्रमोद माकडे, भगवान पाटील, मुरलीधर पाटील, सचिनजी देव, विनोद शेठ नानकर आणि गोपाळ वानखेडे यांनी पाठिंबा पत्रक देऊन उमेदवारांचे आभार व्यक्त केले.

### मुले अभ्यासापेक्षा खेळ, संवाद, गोष्टी व दैनंदिन अनुभवांतून अधिक प्रभावीपणे शिकतात

# बालवाडीतील मुलांचे मानसशास्त्र समजून घेणे गरजेचे – शिक्षिका उमा तायडे

## शिक्षण विश्व : बालवाडीतील 3 ते 6 वर्षे हा मुलांच्या आयुष्यातील संवेदनशील आणि महत्त्वाचा टप्पा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बालवाडीतील ३ ते ६ वर्षे हा मुलांच्या आयुष्यातील अतिशय संवेदनशील आणि महत्त्वाचा टप्पा असून या वयात मुलांवर अभ्यासाचा ताण देणे टाळावे, असे प्रतिपादन प्रियदर्शनी शाळेच्या शिक्षिका उमा तायडे यांनी केले.**

शिक्षिका उमा तायडे म्हणाल्या की, या वयातील मुले अभ्यासापेक्षा खेळ, संवाद, गोष्टी व दैनंदिन अनुभवांतून अधिक प्रभावीपणे शिकतात. मुलांची एकाग्रता मर्यादित वेळेसाठीच असते. त्यामुळे त्यांना जास्त वेळ बसवणे, नीट लिहिण्याचा आग्रह धरणे किंवा इतर मुलांशी तुलना करणे योग्य नाही. अशा अपेक्षांमुळे मुलांमध्ये भीती, तणाव आणि दडपण निर्माण होऊ शकते. प्रत्येक मूल वेगवेगळ्या गतीने शिकते व वाढते. मुलांची तुलना केल्यास त्यांच्या भावनिक विकासावर विपरीत परिणाम होतो, असेही तायडे यांनी स्पष्ट केले. प्रेम, प्रोत्साहन आणि संयम मिळाल्यास मुले सुरक्षित आणि आत्मविश्वासपूर्ण बनतात.

आनंदी मूल लवकर शिकते, असे नमूद करताना त्या म्हणाल्या की चुका करणे हा शिकण्याचा नैसर्गिक भाग आहे. पालकांनी केवळ निकालांवर लक्ष केंद्रित न करता मुलांच्या प्रयत्नांचे आणि छोट्या प्रगतीचे कौतुक केले पाहिजे. बालवाडीची वर्षे ही आत्मविश्वास, जिज्ञासा आणि चांगल्या सवयी घडवण्याची




पायाभरणी करणारी असतात. मुलांना प्रेम आणि आधार मिळाल्यास शिकण्याची प्रक्रिया सहज आणि आनंददायी होते, असे मत शिक्षिका उमा तायडे त्यांनी व्यक्त केले. शैक्षणिक यशापेक्षा मुलांचा भावनिक व मानसिक विकास अधिक महत्त्वाचा असून पालकांनी मुलांवर तसेच स्वतःवरही अनावश्यक ताण टाकू नये, असे आवाहन उमा तायडे यांनी केले.

